महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०१७

तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

मंगळवार, दिनांक १ ऑगस्ट, २०१७ / श्रावण १०, १९३९ (शके)

(१)	**मुख्यमंत्री**	**यांचे प्रभारी विभाग**
(२)	**गृहनिर्माण मंत्री**	
(३)	**कामगार, कौशल्य विकास, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री**	

प्रश्नांची एकूण संख्या - ४७

सायन पनवेल महामार्गावरील टोल बुथवरील कामामध्ये व ठेका देण्याच्या कार्यपध्दतीमध्ये अनियमितता झाल्याबाबत

(१) * **८५३२४ श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सायन पनवेल महामार्गावरील टोल बुथवरील कामामध्ये व ठेका देण्याच्या कार्यपध्दतीमध्ये सकृतदर्शनी अनियमितता झाल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या चौकशीच्या प्रस्तावास शासनाने मान्यता दिल्यानंतर सदर प्रकरणाची चौकशी पुर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, चौकशीतील निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागातील गैरव्यवहार करणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२) व (३) प्रस्तूत चौकशीमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिका-यांनी त्यांच्या पदाचा व अधिकाराचा दुरूपयोग करून गुन्हेगारी स्वरूपाचे कृत्य केले

असल्याचे चौकशीअंती निष्पन्न झाले असल्याने भारतीय दंड विधान सं.क.४२०,१२०(ब),४०९, ४६७,४६८,३४ तसेच लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यातील कलम १३(१)(क)(ड) सह १३(२)प्रमाणे दि.२३/०६/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्याचा तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांच्यामार्फत सुरू आहे.

अंधेरी (मुंबई उपनगर) व डोंबिवली (जि. ठाणे) परीसरात झालेल्या हत्या

(२) * ८५८४५ श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (मुंबई उपनगर) चार बंगला येथील भीमछाया सोसायटी आर टी ओ लेन येथे राहणाऱ्या सुभाष माने यांची सोसायटीमधील पार्किंगच्या वादातून हत्या करण्यात आली असल्याचे दिनांक २ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून सदर प्रकरणी आंबोली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच डोंबिवली, आयरेगाव (जि.ठाणे) येथे दिनांक ३० मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास विक्रांत केणे नामक तरुणाची गोळ्या घालून हत्या करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे एप्रिल व मे, २०१७ या महिन्यात डोंबिवली शहरात मोठ्या प्रमाणावर गोळ्या घालून हत्या झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार सदर दोन्ही हत्या प्रकरणातील आरोपींवर कोणती कारवाई केली तसेच डोंबिवली शहरातील हत्या रोखण्यासाठी पोलीस प्रशासनाने कोणती उपाययोजनात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, सदरहू प्रकरणी अंबोली पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.२९/२०१७ भा.द.वि. कलम ३०२, ३२३, ५०४, ३४ अन्वये गुन्हा नोंद असुन तीन आरोपींविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे.

(२) होय.

(३) व (४) सदर बाबत मे, २०१७ या महिन्यात दोन ठिकाणी गोळया घालून हत्या केल्याबाबत डोंबिवली पो.स्टे. ला अनुक्रमे दि. ९.५.२०१७ रोजी गुरक्र. I ११४/२०१७, भा.दं.वि.कलम ३०२, ३०७, ३६४, १२०(ब), ४५२, १४१,१४३, १४४, १४६, १४७, १४८, १४९, २०१, सह भा.ह.का.कलम ३, २५, २७, व दि. ३०.०५.२०१७ रोजी गुरक्र १३८/२०१७, भा.दं.वि.कलम ३०२, १४३, १४७, १४८, १४९, ३२३, ५०४,५०६ सह शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३, २५, २७ प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

५) डोंबिवली येथील दोन्ही गुन्ह्यात प्रत्येकी ११ आरोपींना अटक करण्यात आली असून सध्या सर्व आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत.

पोलीस प्रशासनाने पुढीलप्रमाणे उपाययोजनात्मक कार्यवाही केली आहे :-

१) डोंबिवली पोलीस ठाणे हद्दीतील गुन्हेगारी नियंत्रणात आणण्याकरीता सी.आर.पी.सी १०७ प्रमाणे ३५ व्यक्तींवर, सी.आर.पी.सी. ११० प्रमाणे १० व्यक्तींवर तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा ५६ प्रमाणे १ व महाराष्ट्र पोलीस कायदा ५७ प्रमाणे ५ प्रस्ताव या प्रमाणे पोलीस ठाणे हद्दीतील एकूण ५१ व्यक्तींवर प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आलेली आहे.

२) डोंबिवली पोलीस ठाणे हद्दीतील वेगवेगळ्या गावांमध्ये वेळोवेळी कोंम्बीग ऑपरेशन आयोजित करुन रेकॉर्डवरील गुन्हेगारांची तपासणी करण्यात येते.

३) पोलीस ठाणे हद्दीत प्रत्येक दिवसातून २ ते ३ वेळा नाकाबंदी आयोजित करुन संशयीत वाहने व बाहेरुन येणाऱ्या वाहनांची तपासणी करण्यात येते.

४) पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीता पीसीआर १, पीसीआर २, आरसीपी मोबाईल तसेच वाढीव वाहने पुरविण्यात आलेली असून त्यांच्या मार्फतीने डोंबिवली पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग केली जाते.

५) डोंबिवली पोलीस ठाणे हद्दीतील बीट मार्शल यांचे बीट हद्दीतील गुन्हे प्रवण क्षेत्रात आर.एफ.आय.डी. (Radio Frequency Identification Device) टॅग लावण्यात आलेले असून त्याप्रमाणे पोलीस ठाणे हद्दीत बीट मार्शल पेट्रोलिंग केली जाते.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

समृध्दी जीवन समूह आणि त्यांचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याबाबत

(३) * ९१५१० श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.किशोर पाटील (पाचोरा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समृध्दी जीवन समूह आणि त्यांचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक महेश मोतेवार यांनी भरमसाठ व्याजदराने परतावा देण्याचे आमिष दाखवून देशभरातील सुमारे २० लाखाहून अधिक गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याप्रकरणी राज्य गुन्हे अन्वेषण विभागाच्या पुणे विभागाने महेश मोतेवार व त्यांच्या दोन पत्नी आणि इतरांवर गुन्हा दाखल केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व तद्नुसार महेश मोतेवार व इतर संबंधीत दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच महेश मोतेवार यांची किती मालमत्त्ता जप्त केली आहे व गुंतवणूकदारांचे पैसे परत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) समृध्दी जीवन समूह यांनी गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याप्रकरणी महेश मोतेवार व इतरांविरुध्द चतुश्रृंगी पोलीस स्टेशन येथे १ व डेक्कन पोलीस ठाणे, पुणे येथे २ गुन्हे असे एकूण ३ गुन्हे दाखल असून सदर गुन्ह्यांचा तपास गुन्हे अन्वेषण विभागाच्या आर्थिक गुन्हे शाखा, पुणेकडून करण्यात येत आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी फिर्यादीचे तक्रारीवरुन चतुश्रृंगी पोलीस स्टेशन येथे ४ आरोपींविरुध्द गु.र.क्र. ३८४/२०१४ कलम ४०६, ४०९, ४२०, १२० (ब) भा.दं.वि. सह एम.पी.आय.डी. कायदा कलम ३ स प्राईज चिट अँण्ड मनी सर्क्युलेशन स्किमस (बॅनींग) ॲक्ट १९७८ चे कलम ४, ५ व ६ सह आर.बी.आय. ॲक्ट १९९९ चे कलम ५८ (बी) व (सी) अन्वये, डेक्कन पोलीस स्टेशन येथे ४ आरोपींविरुध्द गु.र.क्र. ३२३/२०१५ भा.दं.वि. कलम ४२०, १८८, १२० (ब), भा.दं.वि. सह एम.पी.आय.डी. ॲक्ट १९९९ चे कलम ३ व ४ अन्वये व डेक्कन पोलीस ठाणे, पुणे येथे गु.र.नं. २४३/२०१६ भा.दं.वि. कलम ४०९, ४२०, ३४ सह MPID १९९९ चे कलम ३ अन्वये १९ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल आहे, असे एकूण ३ गुन्हे दाखल आहेत. सदर प्रकरणी गु.र.क्र. ३८४/२०१४ या गुन्ह्यामधील ३ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. सदर गुन्ह्यात ३

आरोपींविरोधात मा.सत्र न्यायालय, पुणे येथे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून सदर गुन्ह्याचा पुढील तपास फौजदारी प्रक्रीया संहीता कलम १७३ (८) अन्वये सुरु आहे. तसेच, उर्वरित २ गुन्हे तपासावर आहेत.

(४) चतुश्रृंगी पोलीस स्टेशन येथे दाखल गुन्हा क्रमांक ३८४/२०१४ या गुन्ह्यात महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ चे कलम ४ अन्वये कार्यवाही करणेकामी सक्षम प्राधिकारी म्हणून उप विभागीय अधिकारी, हवेली, जि.पुणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. समृध्दी जीवन समुह व महेश मोतेवार यांच्या भारत भरातील एकूण ३५८ स्थावर मालमत्ता, विविध बँकातील एकूण ७९१ बँक खात्यांची माहिती महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ चे कलम ४ अन्वये कार्यवाही करुन जप्त करणेकामी गुन्हे अन्वेषण विभाग, म.रा. पुणे यांनी सक्षम प्राधिकाऱ्यांकडे पाठविली आहे. तसेच समृध्दी जीवन समुहाच्या मालमत्तांची विक्री प्रक्रिया थांबविणेबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांना राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, म.रा.पुणे यांनी कळविले आहे. याव्यतिरिक्त रु.३१.५३ लक्ष इतक्या किमतीचा ऐवज (सोने, चांदी, रोख रक्कम इ.) हस्तगत करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नांदेड जिल्हयातील दलित वस्ती सुधार योजनेच्या कामांची चौकशी करणेबाबत

(४) * **८७४२९ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील दलित वस्ती सुधार योजनेच्या कामांबाबत अनेक तक्रारी आल्याने मा.पालकमंत्री यांनी सदरील कामास स्थगिती दिली असून या कामांची चौकशी करण्यासाठी जिल्हा परिषद स्तरावर एक समिती गठीत करण्यात येणार असल्याचे माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी समिती गठीत करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, या प्रकरणी दोषी आढळून येणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) नांदेड-वाघाळा महानगरपालिकेअंतर्गत प्रस्तावित कामे दलित वस्तीबाहेरची असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्याने मा.पालकमंत्री, नांदेड यांनी सदर कामांची सविस्तर चौकशी होईपर्यंत निविदा काढण्यात येवू नये अशा सूचना दि. ३० मे, २०१७ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, नांदेड यांना दिल्या आहेत.
(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी प्राथमिक चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्यासाठी सहायक आयुक्त, समाज कल्याण अधिकारी आणि सहायक संचालक, नगररचना नांदेड यांना जिल्हाधिकारी, नांदेड यांनी प्राधिकृत केले आहे. त्यांचा अहवाल अदयाप अप्राप्त आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

बेलापूर (सी.बी.डी.) (नवी मुंबई) येथील अपोलो हॉस्पिटलमध्ये स्थानिकांना रोजगार व उपचार मिळणेबाबत

(५) * ***८८१८७*** **श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बेलापूर (सी.बी.डी) (नवी मुंबई) येथे सिडको बरोबर करार करून अपोलो हॉस्पिटल उभारण्यात आलेले असून या हॉस्पिटलमध्ये स्थानिकांना ३० टक्के जागा राखीव व गरीबांना उपचारात ३० टक्के सवलत देण्याचा करार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अपोलो हॉस्पिटलमध्ये करारानुसार स्थानिकांना रोजगार व उपचार मिळत नसल्याने स्थानिकांनी सिडको व अपोलो हॉस्पिटल विरोधात दिनांक १८ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिकांना रोजगार व उपचार मिळण्यासाठी शासनाकडून कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) सीबीडी बेलापूर, नवी मुंबई येथील सेक्टर क्र.२३ येथील भूखंड क्र.१३ (१४७८३.९६ चौ.मी.) हा सुपर स्पेशालिटी हॉस्पीटलसाठी राखीव ठेवण्यात आला होता. सदर भूखंड निविदेद्वारे अपोलो हॉस्पीटल यांना वाटप करण्यात आला आहे. प्रस्तुतचा भूखंड हा निविदेद्वारे वाटप करण्यात आला

असल्याने अपोलो हॉस्पीटल व सिडको यांच्यामध्ये झालेल्या करारात हॉस्पीटलमध्ये स्थानिकांकरिता ३० टक्के जागा राखीव व गरीबांना उपचारात ३० टक्के सवलत देण्यात येईल असे नमूद करण्यात आलेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

धरमतर खाडीकिनारी (जि.रायगड) जेएसडब्ल्यू कंपनीने खारफुटीची कत्तल करून अनधिकृतपणे जेटीचे बांधकाम केल्याबाबत

(६) * ***८५१८५*** **श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धरमतर (जि.रायगड) जवळील डोलवी येथील खाडीकिनारी जेएसडब्ल्यू कंपनीने खारफुटीची कत्तल करून कोणतीही शासकीय यंत्रणा तसेच सक्षम प्राधिकरणाची परवानगी न घेता जेटीचे बांधकाम केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक ग्रामस्थांकडून रीतसर तक्रार करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार शासनाने संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) धरमतर खाडीतील अस्तित्वातील जेट्टीचा विस्तार करण्यासाठी अतिरिक्त वॉटरफ्रन्ट मंजूर करण्यासंदर्भात महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने मे. जेएसडब्ल्यू धरमतर पोर्ट प्रा.लि. या कंपनीशी दि.०३.१२.२०१४ रोजी करारनामा स्वाक्षांकित केला आहे. तसेच, कंपनीने अस्तित्वातील जेट्टीच्या विस्तारासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ऑथोरिटी आणि केंद्रीय पर्यावरण व वने मंत्रालय यांच्याकडून परवानग्या प्राप्त केल्या आहेत.

(२) होय.

(३) जिल्हाधिकारी, रायगड यांच्यामार्फत तक्रारींची वेळोवेळी दखल घेऊन चौकशी करण्यात आली आहे व सदर कंपनीविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(४) जेएसडब्ल्यू कंपनीविरुध्द दाखल करण्यात आलेल्या गुन्हयाचा स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, रायगड-अलिबाग यांच्यामार्फत तपास चालू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

धर्माबाद (जि.नांदेड) तालुक्यातील पोलीस कर्मचारी वसाहतीची दुरुस्ती करणेबाबत

(७) * ८९०१७ श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धर्माबाद तालुक्यातील (जि.नांदेड) पोलीस कर्मचारी वसाहत जीर्ण झाल्यामुळे भिंतीसह इमारतीच्या छतातून पाणी पाझरत असून त्यामुळे या वसाहतीत राहणा-यांना त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पोलीस वसाहत रेल्वे स्थानकाच्या शेजारी असल्यामुळे सांडपाणी व स्वच्छतागृहाचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने सदर वसाहतीची दुरुस्ती करण्यासोबतच पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन मार्गाचे योग्य नियंत्रण व्हावे यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२), (३) व (४) धर्माबाद येथील पोलीस कर्मचारी वसाहतीमधील निवासस्थानांची दुरुस्ती करण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक ३१.०७.२०१७ रोजी शासनास (गृह विभाग) प्राप्त झाला असून त्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सहमतीने रु.४६,३४,८०४/- इतक्या खर्चाच्या अंदाजास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

मुंबईतील महत्वाच्या विकास कामांना चालना देण्यासाठी भुसंपादनाची प्रकरणे निकाली काढणेबाबत

(८) * ८५१२२ ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने ५४० कोटी रुपये देऊनही जिल्हाधिकारी कार्यालयाकडून भूसंपादन करण्याचे तब्बल १६६ प्रस्तावांवर अद्यापपर्यंत कोणताच निर्णय घेण्यात आला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे शाळा, मनोरंजन मैदाने, डी पी रोड, मार्केट, पार्किंग आदींसारखी महत्वाची विकासकामे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, या जमिनींपैकी सर्वाधिक भूसंपादनाचे प्रस्ताव अंधेरी (पश्चिम) येथील के पश्चिम विभागाकडे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार मुंबईतील महत्वाच्या विकास कामांना चालना देण्यासाठी ही प्रलंबित भूसंपादनाची प्रकरणे निकाली काढण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील : (१) व (२) अंशत: खरे आहे.

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या कार्यालयाशी १२३ तर जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्या कार्यालयाशी ४४ प्रस्ताव असे एकूण १६७ प्रस्ताव संबंधित आहेत.

अ) <u>जिल्हाधिकारी, मुंबई शहर</u> यांचेकडील एकूण ४४ प्रस्तावांपैकी १३ प्रस्तावांवर कार्यवाही सुरु आहे.

उर्वरित ३१ प्रस्तावांची विगतवारी खालीलप्रमाणे :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून अप्राप्त - ९

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे परत पाठविण्यात आलेले - १७

(३) कार्यवाही पूर्ण तथापि न्यायालयात प्रलंबित - ३

(४) निवाडा घोषित परंतु बृहन्मुंबई महानगरपालिकेने ताबा न घेतलेले - २

ब) <u>जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर</u> यांचेकडील एकूण १२३ प्रस्तावांपैकी ५३ प्रस्तावांवर कार्यवाही सुरु आहे.

उर्वरित ७० प्रस्तावांची विगतवारी खालीलप्रमाणे :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे परत पाठविण्यात आलेले प्रस्ताव-५८

(२) आरक्षण रद्द परंतु प्रस्ताव अप्राप्त - १

(३) निवाडा घोषित करुन ताबा देणेसाठी - ५

(४) कार्यालयास अपाप्त - ५

(५) कार्यवाही पूर्ण तथापि न्यायालयात प्रलंबित - १

तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रस्तावांसाठी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचेकडे सुमारे रु.२९४.७० कोटी इतका निधी जमा आहे.(प्रलंबित प्रकरणांसाठी सुमारे रु.२४७.४५ कोटी व महानगरपालिकेकडे परत केलेल्या प्रकरणांसाठी सुमारे ४७.२५ कोटी) आणि जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचेकडे सुमारे रु.५७.५३ कोटी इतका निधी जमा आहे. (प्रलंबित प्रकरणांसाठी सुमारे रु.४६.५० कोटी व महानगरपालिकेकडे परत केलेल्या प्रकरणांसाठी सुमारे ११.०३ कोटी) अशी एकूण सुमारे रु.३५२.२३ कोटी निधी रक्कम जमा आहे.

(३) अंधेरी के / पश्चिम विभागात एकूण २१ भूसंपादनाचे प्रस्तावांपैकी ५ प्रकरणांमध्ये भूखंडाची मालकी म्हाडाकडे असल्याने सदर प्रस्ताव मुंबई महानगरपालिकेने परत घेतले आहेत.

उर्वरित १६ भूसंपादन प्रस्तावांची विगतवारी खालीलप्रमाणे :-

(१) भूसंपादन पूर्ण ; बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात - १

(२) शासनकडून स्थगिती - १

(३) मा. न्यायालयाने आरक्षण विरहीत घोषित केलेले - १

(४) वेगवेगळ्या स्तरावर प्रलंबित -१३

(४) मुंबईतील महत्वाच्या विकास कामांना चालना देण्यासाठी रखडलेली भूसंपादनाची प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी शासन स्तरावरुन संबंधित जिल्हाधिकारी यांना आवश्यक त्या सूचना देण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

सांगोला (जि.सोलापूर) येथील न्यु इंग्लिश स्कुलचे प्राचार्य यांनी विनयभंगाच्या आरोपामुळे केलेली आत्महत्या

(९) * ८५९४४ श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.पो.ता. सांगोला (जि.सोलापूर) येथील न्यु इंग्लिश स्कुलचे प्राचार्य दिलीप फडतरे यांना दिनांक २१ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास काही राजकीय कार्यकर्त्यांनी मारहाण करुन त्यांच्या अंगावर डिझेल व ऑईल ओतून मुलींशी गैरवर्तन व विनयभंगाचा आरोप करुन पोलिसात तक्रार केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित प्राचार्यांनी विनाकारण आरोप झाल्याने कॉलेजच्या चौथ्या मजल्यावरुन उडी मारुन आत्महत्या केल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनिल फडतरे व प्राचार्यांच्या पत्नीने या संपूर्ण प्रकरणाचा तपास पोलिसांच्या उच्चस्तरीय समितीमार्फत वा गुन्हे अन्वेषण विभागामार्फत (सीआयडी) करण्याची मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार प्राचार्य दिलीप फडतरे यांच्या आत्महत्येस कारणीभूत असलेल्या संबंधीत दोषींविरूध कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) सदर तक्रार दिनांक २०/५/२०१७ रोजी दिली आहे.

(२) आरोपीतांनी प्राचार्य यांना शाळेतून बाहेर आणून त्यांचे अंगावर काळे रंगाचे ऑईल तेल ओतून त्यांना शिवीगाळ व दमदाटी करुन मारहाण केल्यामुळे त्यांनी वैफल्यग्रस्त होऊन आत्महत्या केली आहे.

(३) हे, खरे नाही.

(४) होय.

(५) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने एकूण १२ आरोपींच्या विरूध्द सांगोला पो स्टे येथे गु.र. क्र. ३७३/२०१७ अनुसुचित जाती अनुसुचीत जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा, २०१४ चे दुरूस्तकलम ३(१)(एस),३(१)(आर)३ (१)(ई),(एस),३(२), (व्ही) ना.ह.सं.का.क.७(१)(ड) सह भा.दं.वि.का.क. ३०६,३४ प्रमाणे गुन्हा दाखल

झालेला आहे. सदर गुन्ह्याच्या तपासातील निष्पन्न १२ आरोपी पैकी ३ आरोपीतांना अटक केली आहे. आरोपींतांचा मा. उच्च न्यायालय यांनी तात्पुरता जामीन मंजूर केला आहे. गुन्हा तपासावर आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद महानगरपालिकेने काळ्या यादीतील मस्कट कन्स्ट्रक्शन या ठेकेदारास रस्त्याची कामे दिल्याबाबत

(१०) * ९०६११ श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिकेच्या आयुक्तांनी मस्कट कन्स्ट्रकशन या ठेकेदार कंपनीला रस्त्याची निकृष्ट कामे केल्याच्या कारणावरून काळ्या यादीत टाकण्याचे आदेश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, असे असतानाही महानगरपालिका आधिकाऱ्यांनी वेदांतनगरमध्ये डांबरीकरणासाठी रु.२५ लाख १० हजार ४४२ ची निविदा मस्कट कन्स्ट्रकशनला दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोणत्याही कामाची निविदा मंजूर करण्यासाठी शासकीय नियमानुसार किमान ३ निविदा जरूरी आहेत व त्यानंतरच निविदा प्रक्रिया पूर्ण केली जाते मात्र २ निविदा आल्या असतांना नियम डावलून अधिकाऱ्यांनी संबंधित ठेकेदाराची निविदा मंजूर करून कामे दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.

(२) व (३) औरंगाबाद महानगरपालिकेतील वॉर्ड क्र.१०३, वेदांतनगर अंतर्गत राजनगर, पगारिया कॉलनी, गांधीनगर, आदर्शनगर व्दारकापुरी व रामनगर अंतर्गत असलेल्या विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामास मा.स्थायी समितीने दिलेल्या मान्यतेनुसार ई-निविदा मागविण्यात आली होती.चार वेळेस एकही निविदा प्राप्त झाली नाही.तद्नंतर पाचव्या वेळेस या कामासाठी दोन निविदा प्राप्त झाल्या.

प्राप्त झालेल्या निविदांपैकी सर्वात कमी दराची निविदा ही मे.मस्कट कन्स्ट्रक्शन यांची असून, स्थायी सभेच्या मान्यतेने या कामाबाबतचे कार्यादेश देण्यात आलेले असल्याचे औरंगाबाद महानगरपालिकेने कळविलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

विदर्भातील गोसेखुर्द सिंचन प्रकल्पातील नेरला (पाघोरा) उपसा सिंचन योजना आणि घोडाझरी कालव्यातील गैरप्रकाराबाबत

(११) * ८८१३९ प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील गोसेखुर्द सिंचन प्रकल्पातील नेरला (पाघोरा) उपसा सिंचन योजना आणि घोडाझरी कालव्यातील गैरप्रकाराबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळातील १० माजी अधिका-यांसह तीन कंत्राटदार कंपन्यांच्या ४ अधिका-यांवर गुन्हा दाखल केला असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कारवाई करण्याबाबत व तसेच सदर दोषी अधिकारी व कंत्राटदार यांच्यावर न्यायालयात दोषारोपत्र दाखल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) घोडाझरी शाखा कालव्याच्या कामात चौकशीअंती गैरव्यवहार झाल्याचे निष्पन्न झाल्यामुळे आरोपी लोकसेवक तसेच आरोपी कंत्राटदार व भागीदार यांच्याविरूद्ध लाचलुचपत प्रतिबंधक कायदा व भारतीय दंडविधान अन्वये मा. विशेष

न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.तसेच नेरला (पाघोरा) उपसा जलसिंचन योजनेच्या कामात आरोपीं विरूद्ध लाचलुचपत प्रतिबंधक कायदा व भारतीय दंड विधान अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्याचा तपास अद्याप सुरू आहे.

(४) विलंब झालेला नाही.

ठाणे येथील रेल्वे स्टेशन व लगतच्या गांवदेवी परिसरातील अनधिकृत फेरीवाल्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत

(१२) * ८९०५० श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील रेल्वे स्टेशन व त्या लगतच्या गांवदेवी परिसरातील अनधिकृत फेरीवाल्यांविरुध्द कारवाई करणाऱ्या ठाणे महानगरपालिकेच्या उपायुक्तांना तेथील फेरीवाले व दुकानदारांनी जबर मारहाण केल्याची गंभीर घटना दिनांक १० मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उपायुक्तांना मारहाणीमुळे सिव्हील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करावे लागले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले तसेच सदर प्रकरणी संबंधित आरोपीविरुध्द कोणती करवाई करण्यात आली त्याच प्रमाणे सदरचा परिसर फेरीवालामुक्त करण्याचे दृष्टीने शासनस्तरावर व महापालिका स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) ठाणे महानगरपालिकेने संबंधिताविरुध्द नौपाडा पोलीस स्थानकात गुन्हा दाखल केला आहे. तसेच या प्रकरणी ९ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

ठाणे महानगरपालिकेने नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील ठाणे रेल्वे स्टेशन, स्टेशन रोड, गोखले रोड व सॅटीस परिसर हा परिसर “नो हॉकर्स झोन” म्हणुन घोषित केला आहे. तसेच या परिसरातील फेरीवाल्यांवर कारवाई करण्याकरिता विशेष भरारी पथकाची नेमणूक केली आहे.

त्यांचेमार्फत सदरचा परिसर फेरीवाला मुक्त करण्याबाबत कार्यवाही करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

सेनगांव व पांतोडा (जि.हिंगोली) तालुक्यात घडलेल्या लैंगिक अत्याचा-याच्या घटनांबाबत

(१३) * **९२३१३ श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेनगांव, (जि.हिंगोली) येथील दुस-या वर्गात शिकणा-या चिमुकलीला कुल्फीचे आमिष दाखवून भर वस्तीतून नदीच्या काठी नेवून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची घटना दिनांक ५ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, पांतोडा (ता.सेनगांव, जि.हिंगोली) या ठिकाणी एका २७ वर्षाच्या महिलेवर जबरदस्तीने घरात प्रवेश करुन संजय नामक आरोपीने लैंगिक अत्याचार केला व जिवे मारण्याची धमकी दिली असल्याची गंभीर घटना घडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गंभीर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने दोन्ही प्रकरणातील आरोपींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय.

(४) सेनगांव जि. हिंगोली येथिल घटनेमध्ये पो.स्टे सेनगांव गुरनं ९७/१७ कलम ३७६ (आय)(जे) भादवि,३,४ बा.लै.अ.प्र.का. अन्वये अनोळखी इसमा विरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

अत्याचाराबाबत पिडीत मुलगी व साक्षीदार यांनी सांगितलेल्या वर्णनावरुन आरोपीचे रेखाचित्र प्रसिध्द करून त्याचा शोध घेण्याचा पोलीस तपास करीत आहे.

पांतोडा ता. सेनगांव जि. हिंगोली येथिल घटनेत पो. स्टे. सेनगांव गुरनं ९६/१७ कलम ३७६, (२)(१), ५०६(२) भादंवि अन्वये गुन्हा दाखल करून आरोपीस अटक करण्यात आलेली आहे. सदर गुन्हा तपासावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील अनेक पेट्रोलपंप चालक मशीनमध्ये आधुनिक तंत्राचा वापर करुन पेट्रोल व डिझेलची चोरी करीत असल्याबाबत

(१४) * ९००२१ श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील गुन्हे शाखेने नागपूरच्या मानकापूर परिसरातील रबज्योत ऑटोमोबाइल्सवर मारलेल्या छाप्यातून आधुनिक तंत्राचा वापर करुन मशिनमध्ये विशिष्ट इलेक्ट्रीक चिपद्वारे लाखो रुपयांची पेट्रोल व डिझेलची चोरी होत असल्याचे दिनांक २६ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ठाणे, नाशिक, पुणे, रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्यासह सात जिल्ह्यांतील ४४ पंपावर टाकलेल्या छाप्यात ३० पंपावर पेट्रोलची चोरी होत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पेट्रोलपंप मशिनमधील पल्सरमध्ये इलेक्ट्रीक चिपचा वापर करुन पेट्रोल व डिझेल चोरी करणाऱ्या पेट्रोलपंपाची संख्या वाढली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) सदर प्रकरणी ठाणे पोलीस आयुक्तालयातील कल्याण-शिळ रोडवरील अरमान सेल्स या पेट्रोलपंपावर गुन्हे शाखा, ठाणे शहर येथील अधिकाऱ्यांनी छापा टाकून कारवाई करून मानपाडा पोलीस स्टेशन, डोंबिवली येथे गु.र. क्र. ३५३/२०१७ भा.दं.वि. कलम २६५, २६७, ४२०, ४६५, ४६८, ४७१, ४७३, ३४ सह दि. मोटार स्पीड ॲण्ड हाय स्पीड डिझेल (रेग्युलेशन ऑफ सप्लाय डिस्ट्रीब्युशन ॲण्ड प्रिव्हेन्शन ऑफ माल प्रॅक्टीसेस) ऑर्डर २००५ क्लॉज ३,(६) चे उल्लंघन, सह अत्यावश्यक वस्तु अधिनियम १९५५ चे कलम ३,७,८,९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदर गुन्हयातील अटक आरोपींनी दिलेल्या माहीतीच्या आधारे ठाणे गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी राज्यातील एकूण १६ जिल्हयातील ११२ पेट्रोलपंपावर छापा टाकून कारवाई केलेली आहे त्यापैकी ६६ पेट्रोलपंपावर बनावट प्रोग्रामिंग केलेले इंटीग्रेटेड सर्कीट (I.C.) चा वापर करून ५ लिटरमागे ४० मिली ते ३०० मिली पर्यत कमी पेट्रोल व डिझेलचा पुरवठा ग्राहकांना करून ग्राहकांची मोठ्या प्रमाणावर आर्थिक फसवणूक केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. तसेच प्रस्तुत गुन्हयात २३ आरोपींना आतापर्यत अटक केलेली आहे तसेच सदर गुन्हयातील पाहीजे असलेले १३ आरोपीत (विविध पेट्रोलपंपाचे मालक) यांना अटक करण्याची कारवाई चालू आहे. गुन्हा तपासावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला शहरातील रेन वॉटर हार्वेस्टिंगसाठी तयार केलेल्या शोषखड्ड्यात दोन बालकांचा पडून मृत्यू झाल्याबाबत

(१५) * **९१८७३ श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरातील महानगरपालिका शाळा क्रमांक १६ समोर असलेल्या मैदानात रेन वॉटर हार्वेस्टिंगसाठी तयार केलेल्या शोषखड्ड्यांत माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान दोन बालकांचा पडून मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींविरूद्ध पोलिसांनी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे आहे.

मात्र उपरोक्त घटना ही दिनांक १४.०८.२०१६ रोजी घडलेली आहे.

(२) व (३) दिनांक १४.०८.२०१६ रोजी ७ वर्षे व १० वर्षे वय असलेली दोन मुले अकोला शहरातील मनपा शाळा क्र. १६ समोरील मैदानातील बांधावर खेळत असतांना तेथे खोदलेल्या शोषखडडयात पाय घसरुन पडल्याने व त्यांना तेथून बाहेर पडता न आल्याने ते पाण्यात बुडून मृत्युमुखी पडले. मृतकांचा पोस्टमार्टम रिपोर्ट प्राप्त झाला असून त्यामध्ये Death due to drowning असे कारण दिले आहे. याप्रकरणी अ.मृ. क्रमांक ३४९/२०१६, भा.दं.वि. कलम ३०४(अ), ३४ प्रमाणे पो.स्टे. खदान, जि.अकोला येथे गुन्हा दाखल करण्यांत आला आहे.

याप्रकरणी दोन आरोपींना दिनांक २७.०५.२०१७ रोजी अटक करण्यांत आली आहे. प्रकरणाचा तपास पूर्ण झाला असून दोनपैकी एक आरोपी हा लोकसेवक (प्राध्यापक) असल्याने कलम १९७ सीआरपीसी प्रमाणे विभागप्रमुखांची परवानगी मिळताच न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यांत येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अंधेरी (मुंबई) परिसरातील त्रिधा इंटरनॅशनल शाळेच्या नर्सरीमध्ये शिकणाऱ्या मुलीवर शाळेच्या विश्वस्ताने लैंगिक अत्याचार केल्याबाबत

(१६) * ८५२३७ श्री.विजय औटी (पारनेर), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अंधेरी (पूर्व) येथील त्रिधा इंटरनॅशनल स्कूल मधील ४ वर्षीय मुलीवर सदर शाळेच्या विश्वस्ताने एका महिला शिक्षकेच्या मदतीने लैंगिक अत्याचार केल्याचे दिनांक १३ जुन, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लैंगिक शोषण केल्याप्रकरणी शाळेच्या विश्वस्तांसह शिक्षिकेविरोधात एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शाळेचा विश्वस्त हा भारतीय नसून तो फरार झाला आहे तसेच सदर प्रकरण वृत्तवाहिन्या व वृत्तपत्रांमध्ये आल्यामुळे शाळेतील विद्यार्थी व पालकांच्या मनोधैर्यावर परिणाम होऊन शाळेची मोठ्या प्रमाणावर बदनामी झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे. फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार सदर घटना माहे मे, २०१७ मधील आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही,

आरोपी दि. १४.०५.२०१७ ते दि. २१.०५.२०१७ या कालावधीत शैक्षणीक सहलीसाठी युरोप येथे गेले होते. सहलीवरून परत आल्यानंतर दोन्ही आरोपी पोलीस स्टेशन मध्ये हजर होऊन गुन्हयाच्या अनुषंगाने सविस्तर जबाब घेण्यात आलेला आहे.

(४) होय,

(५) गुन्हयाचे अनुषंगाने विद्यार्थ्यांचे पालक व शाळेतील शिक्षक इत्यादीचे जबाब नोंदविण्यात आलेले आहेत. फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून आरोपी विरूध्द एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे गु.रं.क्र.२११/२०१७ कलम ३७६(२)(आय) भा.द.वि.स. सह लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२ कलम ४,६,१० अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. याबाबत पोलीस तपास सुरू आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महानगरपालिकेतील दक्षता विभागातील अधिकाऱ्यांनी एकाच महिन्यात अनेक कामांना ना हरकत प्रमाणपत्र दिल्याबाबत

(१७) * ८५१११ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेतील दक्षता विभागातील अधिका-यांनी कंत्राटदरांच्या कामांच्या पूर्ततेनंतर तपासणीसाठी सादर झालेल्या कामांच्या ३६५६ प्रस्तावांपैकी तब्बल ३१२८ कामांना माहे मार्च,२०१७ या एका महिन्यात दक्षता विभागातील अधिका-यांनी ना हरकत प्रमाणपत्र दिल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एका कामाची तपासणी करण्यासाठी दक्षता विभागास साधरणत: १५ दिवस ते १ महिन्याचा कालावधी लागत असल्याचे मागील कालावधीतील कामांवरून दिसून येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा प्रकारे एकाच महिन्यात तब्बल ३१२८ कामांना ना हरकत प्रमाणपत्र देण्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय व त्यात काय आढळून आले आहे, चौकशीनुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस :(१), (२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील कंत्राटी कामांच्या पूर्ततेनंतर महानगरपालिकेच्या दक्षता विभागाकडून सन २०१४ पासून सॅप प्रणालीद्वारे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येते.

त्यानुसार सदर ना-हरकत प्रमाणपत्र देण्याच्या कार्यपध्दतीचे टप्पे खालील प्रमाणे आहेत :-

- सॅप प्रणालीद्वारे दक्षता विभागास निवडक कामे तपासणीसाठी प्राप्त होतात.
- कामांचे स्थळनिरीक्षण व तपासणी करणे
- तपासणीनुसार दक्षता विभागाचा अहवाल संबंधित खात्यांना सॅप प्रणालीद्वारे पाठविणे
- संबंधित खात्याकडून कार्यपूर्ती अहवाल दक्षता विभागास प्राप्त होणे
- कार्यपूर्ती अहवालानुसार दंड, बचत इ. आकारुन प्रकरणे निकाली काढणे

सदर कामांची तपासणी म्हणजेच स्थळनिरीक्षण, कामांचा त्रुटी अहवाल व संबंधित खात्याकडून त्रुटीबाबतचा कार्यपूर्ती अहवाल सादर केल्यानंतर प्रकरण निकाली काढणे यासाठी लागणारा कालावधी हा त्या-त्या कामाच्या स्वरुपानुसार असतो.

सदर कामे ही मुख्यत: सप्टेंबर-ऑक्टोबर या महिन्यात सुरु होतात व महानगरपालिकेच्या संबंधित विभागाकडून बहुतांशी कार्यपूर्ती अहवाल हे मार्च महिन्यात दक्षता विभागाकडे पाठविले जातात. सन २०१७ च्या मार्च महिन्यात ३१२७ नोटीफिकेशन्स बंद करण्यात आली आहेत ही वस्तुस्थिती आहे.

(४) सदर प्रकरणी महानगरपालिका प्रशासनामार्फत आढावा घेण्यात आला असून, सॅप प्रणालीमध्ये अशा स्वरुपाच्या कामाच्या अधिदानाशी नोटीफिकेशन्स बंद करण्याची सांगड काढून टाकण्यात आली आहे.

तसेच, महानगरपालिकेच्या दि. ०८.१२.२०१६ च्या परिपत्रकानुसार, उपरोक्त नमूद कार्यपध्दतीतील टप्प्यांना कालावधी ठरवून देण्यात आला असून त्यानुसार सन २०१७-१८ मध्ये अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

कोकणगांव खुर्द (ता.दिंडोरी, जि.नाशिक) येथे तिघांची निर्घृण हत्या झाल्याबाबत

(१८) * ८६४६८ डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणगांव खुर्द (ता.दिंडोरी, जि.नाशिक) येथील टॉवरच्या माथ्यावरील मळ्यात जगन्नाथ शेळके, शोभा शेळके व हर्षद शेळके या तिघांची निर्घृण हत्या झाल्याची दिनांक ३० मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी वणी पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) सदर प्रकरणी वणी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ७५/२०१७ भा.दं.वि. कलम ३०२, २०१ प्रमाणे दि.३१/०५/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असुन एका आरोपीस अटक करण्यात आली आहे.

सदर प्रकरणाचा तपास पूर्ण झाला असून मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(५) विलंब झालेला नाही.

नागपूरमध्ये वाढत असलेल्या गुन्ह्यांवर प्रतिबंध घालण्यासाठी करावयाची उपाययोजना

(१९) * ८५००० श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथे गंभीर गुन्ह्यांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून माहे जानेवारी ते जून २०१७ या सहा महिन्यात ३० खुनांच्या घटना, ५० बलत्काराच्या घटना, ७८० चोरीच्या घटना, ९० जबरी चोरीच्या घटना, १२२ अपहरणाच्या घटना घडलेल्या असून मागील दोन वर्षाच्या तुलनेत हा आकडा वाढतच चालला असल्याची माहिती दिनांक १५ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या गंभीर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार दिवसेंदिवस नागपूरात गंभीर गुन्हयात वाढ होत असल्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजनात्मक कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) नागपूर येथे सन २०१५ मध्ये ८८ खुनाच्या घटना, १७८ बलात्काराच्या घटना, ३१०८ चोरीच्या घटना, ४७२ जबरी चोरीच्या घटना, ३७१ अपहरणाच्या घटना तर सन २०१६ मध्ये ९५ खुनाच्या घटना,१७३ बलात्काराच्या घटना, ३०४५ चोरीच्या घटना, ३४३ जबरी चोरीच्या घटना, ५११ अपहरणाच्या घटना घडलेल्या आहेत.

जानेवारी ते जून, २०१७ व २०१६ चा तत्सम कालावधीची तुलना केल्यास बलात्कार मध्ये घट झाली आहे तर चोरी, जबरी चोरी व अपहरण या सदरी वाढ झाली आहे. खून या सदराखालील घटनेमध्ये बदल नाही म्हणून नागपूर शहरात गुन्हयामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे, हे म्हणणे संयुक्तिक नाही.

(२) व (३) सदर प्रकरणी चौकशी केली असता माहे जानेवारी २०१७ ते माहे जून, २०१७ या कालावधीत खून, बलात्कार, चोरी , जबरी चोरी, अपहरणाच्या घटनामध्ये मागील दोन वर्षाच्या तुलनेत वाढ झालेली नाही.

नागपूरातील नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने खालीलप्रमाणे कार्यवाही केलेली आहे.

अ) पोलीस आयुक्तालय, नागपूर शहर तर्फे नागपूर पोलीस आयुक्त वेबसाईट, Twitter, Face- book, Whatsup Group , १०० Number, DCRMS ची २० लाईन पोलीस स्टेशनचे सर्व वाहनांवर जी.पी.एस. सिस्टीम बसवून कार्यान्वित करण्यात आली आहे.

आ) पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस स्टेशनचे Twitter Account उघडण्यात आले असून त्याद्वारे जनतेशी दैनंदिन संपर्क वाढलेला असून तीव्र गतीने जनतेच्या तक्रारीचे निराकरण करण्यात येत आहे.

इ) नागपूर शहर पोलीस आयुक्तालयात एक मिडीया व्हॅन तयार करण्यात आली असून त्याद्वारे पॉन्झी स्किम, सायबर व आर्थिक गुन्हयांची माहीती, महिला व लहान मुलांविरूद्ध घडणारे गुन्हे, बोगस पोलीस, रस्त्यावर घडणारे गुन्हे, इत्यादी अपराधाबाबत मोठ्या प्रमाणात सार्वजनिक ठिकाणी तसेच शाळा व कॉलेजेस मधून मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात येत आहे. तसेच सायबर तक्रार निवारण केंद्र सुरू करण्यात आले असून महिला/मुलींना तातडीने मदत मिळणेकामी भरोसा सेल सुरू करण्यात आले असून दामिनी पथक BUDDY COPS/ CYBER SAFETY उपक्रम देखील कार्यान्वीत करण्यात आला आहे.

ई) नागपूर शहरात एकूण २९ सी. आर. व्हॅन आणि ई- पेट्रोलींग मोबाईल कार्यान्वीत करण्यात आलेल्या असून प्रत्येक मोबाईल व एका ॲपद्वारे लेखी सुचना देण्यात येते व त्यांचे हालचालीबाबतची सुचना पोलीस स्टेशनला प्राप्त होते तसेच गँग गुन्हेगार चेकींग, सराईत गुन्हेगार चेकींग सातत्याने सुरू आहे. एक पोलीस एक गुन्हेगार चेकींग योजना कार्यान्वित आहे.

उ) प्रत्येक परिमंडळामध्ये ई- पेट्रोलींग ॲप सुरू करण्यात आले आहे. या ॲपद्वारे गस्त चेकींग करण्यात येत असून इतरत्र पोलीस स्टेशनला देखील ही पद्धत अवलंबिण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

बेस्ट उपक्रमास आर्थिक अनुदान तसेच वीजबिलापोटी थकीत असलेली रक्कम देण्याबाबत

(२०) * ८५४१२ श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेस्ट उपक्रमाच्या सुमारे ४२ हजार कर्मचाऱ्यांचे माहे फेब्रुवारी, २०१७ चे वेतन प्रलंबित असल्याने तसेच बेस्ट उपक्रमाच्या सार्वजनिक परिवहनाला चालना देण्याकरिता आणि मुंबई शहरातील विद्युत पुरवठा अखंडित व पूर्ण कार्यक्षमतेने चालू राहून उपक्रमाची संचित तुट भरून निघण्यासाठी बेस्ट उपक्रमास रु.३०००/- कोटी रुपये इतके आर्थिक अनुदान देण्याची मागणी दिनांक १६ मार्च,२०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे लोकप्रतिनिधी यांनी मा.वित्त मंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून बेस्टला वीजबिलापोटी देय असलेली २३ कोटी ८७ लाख ३ हजार १८२ ऐवढी रक्कम थकीत असून बेस्ट प्रशासनाने शासनास वारंवार नोटिसाही बजावलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने बेस्ट उपक्रमास आर्थिक अनुदान देण्याबाबत तसेच बेस्टला देय असलेली रक्कम विनाविलंब अदा होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) सदर प्रकरणी लोकप्रतिनिधींनी दिनांक १७.०३.२०१७ रोजीच्या लेखी निवेदनाद्वारे अनुदान देण्याची मागणी केली आहे ही वस्तुस्थिती आहे.

(२) बेस्ट उपक्रमास पोलीस, शासकीय रुग्णालये, न्यायालये व शासकीय कार्यालये यांचेकडे माहे मे, २०१७ पर्यंत वीज बिलापोटी रु. २६ कोटी ७३ लाख ९६ हजार १०९ इतकी रक्कम थकीत असल्याचे निदर्शनास आले.

सदर प्रकरणी बेस्ट प्रशासनामार्फत संबंधितांना कळविण्यात आले असून वसुलीची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) व (४) बेस्ट उपक्रमास देय असलेली रक्कम अदा करण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत.

मुंबईतील भांडूप, मुलुंड, विक्रोळी, तानाजी नगर (मालाड) या डोंगराळ भागातील पाणी समस्या सोडविणेबाबत

(२१) * ८६११० श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील भांडूप, मुलुंड, विक्रोळी, तानाजी नगर (मालाड) भागातील मोठी लोकवस्ती डोंगराळ भागात राहत असल्याने त्यांना पुरेसा पाणीपुरवठा होत नसल्यामुळे वर्षानुवर्षे पाणीटंचाईला सामोरे जावे लागत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भागातील रहिवाशांना वर्षानुवर्षे टँकरचे पाणी मिळत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भागामध्ये महानगरपालिका व स्थानिक लोकप्रतिनिधींच्या निधीतून टाक्या बसवण्यात आल्या आहेत परंतु नागरिकांना महिन्याला ४००/- ते ७००/- रुपये घेऊन पाण्याची विक्री केली जात असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे काय,

(४) असल्यास, सदर डोंगराळ भागाचा अभ्यास करून तेथील पाणी समस्या कायमस्वरूपी सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) भांडुपमध्ये रहिवाशांची पाण्यासाठी वणवण अशा स्वरुपाची बातमी माहे जून, २०१७ मध्ये वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती.

तथापि, भांडुप, मुलुंड, विक्रोळी व तानाजी नगर (मालाड) येथील डोंगराळ भागात पाणी पुरवठा करणे सोयीचे व्हावे यासाठी महानगरपालिका व स्थानिक

लोकप्रतिनिधींच्या निधीतून बांधण्यात आलेल्या ६४ सहाय्यकारी शोषण टाक्यांमधून उदंचन केंद्रामार्फत पाणी पुरवठा करण्यात येतो. सदर टाक्या व्यवस्थापनासाठी रहिवाशांच्या संघटनांना देण्यात आल्या आहेत.

सदर संघटनांकडून पाणी, वीज, देखभालीच्या खर्चासाठी सभासदांकडून आकार घेण्यात येतो.

सदर परिसरात टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत नाही.

(४) भांडुप, मुलुंड, विक्रोळी व तानाजी नगर येथील डोंगराळ भागातील पाणी पुरवठ्यामध्ये सुधारणा करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही सुरु आहे:-

• भांडूप येथील टेंबीपाडा परिसरात थेट पाणीपुरवठा करण्यासाठी उदंचन केंद्र व संलग्न वितरणप्रणाली टाकण्याचे प्रस्तावित आहे.

• विक्रोळी (प) येथील सुर्यानगर येथील डोंगराळ भागाकरीता निम्नस्तरावर शोषण टाकी व पंपरुम बांधण्यात आली असून पाणीपुरवठ्याकरीता अस्तित्वात असलेली ६०० मि.मी. व्यासाची जलवाहिनी बदलून ७५० मि.मी. व्यासाची जलवाहिनी टाकण्यात आलेली आहे.

• तानाजी नगर, मालाड येथील पाणी पुरवठ्यामध्ये सुधारणा होण्याकरीता ६०० मि.मी. व्यासाच्या दोन जलवाहिन्या निष्कासित करुन त्या ठिकाणी ९०० मि.मी. व्यासाची जलवाहिनी टाकण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे महानगरपालिकेंतर्गत लेखा परिक्षणातील आक्षेपाची पुर्तता न केल्याने महानगरपालिकेला आर्थिक नुकसान झाल्याबाबत

(२२) * ८९४७५ श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेला अंतर्गत लेखापरिक्षणातील आक्षेपाची पुर्तता न केल्याने आर्थिक वर्ष सन २००७-०८ ते सन २०१३-१४ पर्यंत एकूण ३९६ कोटी रुपये आर्थिक नुकसान झाल्याची बाब माहे एप्रिल, २०१७ वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आतापर्यंत प्रलंबित असलेल्या १४१०१ महालेखाकारांच्या आक्षेपांची पुर्तता अद्याप करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीच्या अनुषंगाने सदर नुकसानीस जबाबदार असलेल्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) सन २००७-०८ ते सन २०१३-१४ या कालावधीत झालेल्या अंतर्गत लेखापरिक्षणात एकूण ३३३३ आक्षेपांमध्ये सुमारे रुपये ४५९.८३ कोटी इतकी रक्कम आक्षेपाधीन होती.

या कालावधीत सुमारे रुपये १७५.३६ कोटी इतक्या रक्कमेच्या एकूण ६६६ आक्षेपांचे निराकरण करण्यात आले आहेत.

सद्य:स्थितीत २६६७ आक्षेप प्रलंबित आहेत व यामध्ये गुंतलेली रक्कम सुमारे रुपये २८४ कोटी इतकी आहे.

आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना उर्वरीत आक्षेपांचे निराकरण पुढील ९० दिवसात करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कुरण (ता.संगमनेर, जि.अहमदनगर) येथे बेकायदेशीर सुरु असलेल्या कत्तलखान्यावर कारवाई करण्याकरिता गेलेल्या पोलीसांना मारहाण झाल्याबाबत

(२३) * ८५२४५ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुरण (ता.संगमनेर, जि.अहमदनगर) येथे बेकायदेशीर सुरु असलेल्या कत्तलखान्यांवर कारवाईसाठी गेलेल्या पोलीस निरिक्षक गोविंद ओमासे यांच्या पोलीस पथकावर नासिर शेख व सदर कत्तलखाना चालकांनी प्राणघातक हल्ला करुन अनेक पोलीसांना जबर मारहाण करुन जखमी केल्याची घटना दिनांक १९ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत दोन वर्षात या बेकायदेशीर कत्तलखान्यांवर शहर निरिक्षक गोविंद ओमासे यांनी अनेकवेळा धाडसी कारवाया करुनही सदर कत्तलखाना बेकायदेशीररित्या सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोलीसांना मारहाण करणाऱ्या संबंधीत कत्तलखान्याच्या मालक व अन्य व्यक्तींविरोधात कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

(२) गत दोन वर्षात संगमनेर शहरातील कसाई खाना, मदीनानगर, जमजम कॉलनी, भारतनगर या भागात चालणाऱ्या बेकायदेशीर कत्तलखान्यांवर पोलीस निरीक्षक श्री. गोविंद ओमासे यांनी आजपावेतो ६० वेळा कारवाई करुन १२४ आरोपींना अटक केली आहे.

(३) सदर घटनेबाबत संगमनेर शहर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १६६/२०१७ भा.दं.वि. कलम ३०७, ३३३, ३५३, ३३२, ३२३, ५०४, ४४३, ४४७, ४४८, ४४९ सह महाराष्ट्र गोवंश हत्याबंदी प्रतिबंधक कायदा कलम ५ (अ), १, ९, व प्रा.नि.का.त. ३, ११, म.पो.का.३७(१) (३)/१३५ व क्री.लॉ.ॲमेडमेंट ॲक्ट कलम ७ प्रमाणे दि.१९/०५/२०१७ रोजी ३७ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्यात १६ आरोपींना अटक करण्यात आली असून उर्वरित आरोपींचा शोध घेण्यात येत आहे. सदर गुन्ह्याचा तपास चालू आहे.

(४) विलंब झाला नाही.

मुंबईत विजेची चोरी करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

(२४) * ८८४२५ श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.योगेश सागर (चारकोप), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत वीज बिल वाचविण्यासाठी विजेची चोरी करणाऱ्यांविरुध्द बेस्ट वीज उपक्रमाच्या दक्षता पथकाने केलेल्या कारवाईत जानेवारी ते एप्रिल, २०१७ या पाच महिन्यांच्या कालावधीतच ५०३ प्रकरणात १४ कोटी ६५ लाख रुपयांची वीजचोरी निदर्शनास आणून ३३० जणांवर गुन्हे दाखल केल्याची बाब दिनांक १ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेस्ट विद्युत विभागाच्या दक्षता पथकाने माझगाव, मुंबई येथील बॉम्बे टी स्टेनिंग ही कंपनी विद्युत मीटरमध्ये रात्री वीजचोरी करत असल्याचे आढळून आले असून गेल्या साडेपाच वर्षात या कंपनीकडून तब्बल ९ कोटी रुपयांची वीजचोरी झाल्याचेही माहे जून,२०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहीम (मुंबई) येथील हिंदुजा रुग्णालयाच्या बाजूला असलेल्या स्टेट्स रेस्टॉरंटची बेस्टच्या वीज दक्षता विभागाने पाहणी केली असता गेल्या दहा वर्षापासून या रेस्टॉरंटमध्ये विजेची चोरी होत असल्याने चार कोटी रुपयापेक्षा जास्त रक्कमेची वीज चोरी झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बेस्टच्या दक्षता विभागाने सदर रेस्टॉरंटचे मालक श्री. शेखर नारायण शेट्टी यांच्याविरुद्ध माहीम पोलिस ठाण्यात तक्रार केल्यानंतर पोलीसांनी शेट्टी यांच्याविरुद्ध एफ.आय.आर नोंदणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर वीज चोरी करुन बेस्टचा महसुल बुडविणाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रमाच्या दक्षता विभागाने माहे जानेवारी ते एप्रिल, २०१७ या चार महिन्यांत एकूण ७३२ प्रकरणात १६.२७ कोटी रुपयांची वीज चोरीची प्रकरणे उघडकीस आणली असून, सदर प्रकरणी ४२६ जणांवर वीज चोरीचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(२) बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रमाच्या दक्षता विभागाने दिनांक १३.०५.२०१७ रोजी केलेल्या तपासणीमध्ये, बॉम्बे टी. स्टेनिंग मॅन्युफॅक्चरिंग कंपनी, माझगांव, मुंबई यांचेमार्फत दिनांक ०८.११.२०११ पासून वीज चोरी होत असल्याचे उघडकीस आले.

बेस्टने सदर वीज चोरीबाबत रु.९.०१ कोटी इतक्या रकमेचा प्राथमिक दावा केला आहे.

(३), (४), (५) व (६) बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रमाच्या दक्षता विभागाने दिनांक २०.०४.२०१७ रोजी केलेल्या तपासणीमध्ये, स्टेटस रेस्टॉरंट व शगुन बँक्वेट हॉल माहिम, मुंबई यांचेमार्फत अनुक्रमे दिनांक ०५.०९.२००६ व दिनांक २८.०५.२०११ पासून वीज चोरी होत असल्याचे उघडकीस आले.

बेस्टने स्टेटस रेस्टॉरंटच्या वीज चोरी प्रकरणी रु. ३.४३ कोटी व शगुन बँक्वेट हॉलच्या वीज चोरी प्रकरणी रु. १.१२ कोटी अशा एकूण रु. ४.५५ कोटी इतक्या रकमेचा प्राथमिक दावा केला आहे.

स्टेटस रेस्टॉरंट व शगुन बँक्वेट हॉलचे मालक श्री. शेखर नारायण शेट्टी यांचेविरोधात सदर वीज चोरी प्रकरणी माहिम पोलीस ठाणे येथे एफ.आय.आर. क्रमांक १६/२०१७, दिनांक २०.०४.२०१७ भारतीय विद्युत कायदा २००३ कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्टेटस रेस्टॉरंट व शगुन बँक्वेट हॉलच्या मालकाने प्राथमिक दाव्याच्या रकमेपैकी रु. १.७० कोटी इतक्या रकमेचा भरणा बेस्ट प्रशासनाकडे केल्यानंतर सदर हॉटेल्सचा वीज पुरवठा सुरु करण्यात आला आहे व उर्वरित रकमेच्या वसुलीसाठी बेस्ट प्रशासनामार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे.

बॉम्बे टी. स्टेनिंग मॅन्युफॅक्चरिंग कंपनीचे मालक श्री. सिकंदर रतलामवाला यांचेविरोधात वीज चोरी प्रकरणी भायखळा पोलीस स्टेशन येथे एफ.आय.आर. क्रमांक ७९/२०१७, दिनांक १३.०५.२०१७, भारतीय विद्युत कायदा २००३ कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, सदर कंपनीचा वीज पुरवठा दिनांक १३.०५.२०१७ पासून खंडीत करण्यात आला आहे.

मुंबईतील म्हाडाच्या ५६ वसाहतींचा पुनर्विकास करण्याबाबत

(२५) * ८७१८४ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या विविध भागात असलेल्या म्हाडाच्या ५६ वसाहतींचा विकास मागील १० वर्षापासून प्रलंबित असून या वसाहतीतील बहुतांश इमारती जुन्या झालेल्या असून अनेक इमारतींमधील छतेही वेळोवेळी कोसळल्यामुळे पावसाळयात गळती लागणे, काही इमारतीची अतिशय दुरवस्था झाल्यामुळे वसाहतीमध्ये राहणाऱ्या एकुण ८८ हजार कुंटूंबांना अनेक गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, म्हाडाच्या पुनर्वसन कायद्यांतर्गत ३३(५) या इमारतींचा पुनर्विकास करण्याची योजना असून या इमारतींचा विकास करणाऱ्या संबंधित विकासकाने

म्हाडाला प्रिमीयमची रक्कम द्यायची व त्याबदल्यात विकासकाला जागेचा विकास करण्यास परवानगी दिली जाईल असा सन २००८ मध्ये निर्णय झाला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, म्हाडाने पूर्वीच्या निर्णयात बदल केला आणि प्रिमियमची अट रद्द करून विकासकाकडे घरांची मागणी केली असल्याने विकासकांनी विकासाच्या बदल्यात घरे देण्यास विरोध केला असून घरांऐवजी प्रिमीयम देवू अशी भूमिका घेतलेली आहे व त्याबाबत शासनाकडून अद्यापपर्यंत कोणताही निर्णय झालेला नाही,

(४) असल्यास, सन २००८ पासून अद्यापपर्यंत म्हाडाच्या वसाहतींच्या पुनर्विकासाचे काम संपूर्णत: बंद पडलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, म्हाडाच्या ५६ वसाहतींच्या पुनर्विकास लवकरात लवकर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता : (१) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांचेकडून प्राप्त अहवालानुसार म्हाडाच्या ५६ वसाहतीमधील इमारती जुन्या व जीर्ण झालेल्या आहेत. यापैकी काही इमारतींनी पुनर्विकासाची कार्यवाही केली असून काहींची प्रगतीपथावर आहे. इतर सहकारी गृहनिर्माण संस्थांनी त्यांच्या इमारतींची देखभाल करणे अपेक्षित आहे.

(२) म्हाडा वसाहतींमधील इमारतीच्या पुनर्विकासासाठी विकास नियंत्रण नियमावली ३३(५) बाबतची अधिसूचना दि. ०६.१२.२००८ रोजी प्रसिध्द झालेली होती. यामध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांना त्यांच्या पुनर्विकासाकरीता अतिरिक्त बांधकाम क्षेत्र अधिमुल्यावर आधारित किंवा गृहसाठा हिस्सेदारीवर आधारित हे दोन पर्याय उपलब्ध होते.

(३) शासनाने दि. १४.११.२०१३ रोजी विकास नियंत्रण नियमावली ३३(५) बाबतची सुधारित अधिसूचना प्रसिध्द केली. यानुसार सहकारी गृहनिर्माण संस्थांना त्यांच्या पुनर्विकासाकरीता अतिरिक्त बांधकाम क्षेत्र केवळ गृहसाठा हिस्सेदारीवर देण्याची तरतूद होती. या अधिसूचनेत फेरबदल करणारी अधिसूचना दि. ०३.०७.२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. यानूसार ४०००.०० चौ.मी. पर्यंतच्या भूखंडावरील सहकारी गृहनिर्माण संस्थांना त्यांच्या पुनर्विकासाकरीता अतिरिक्त बांधकाम क्षेत्र अधिमुल्यावर आधारित देण्याची तरतूद देखील उपलब्ध करण्यात आलेली आहे

(४) हे खरे नाही.

(५) दि. १४.११.२०१३ रोजीच्या अधिसूचनेत फेरबदल करणारी अधिसूचना दि. ०३.०७.२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

बुलढाणा शहरात शुध्द पाणी पुरवठा करण्याबाबत

(२६) * ८६२९६ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा शहरातील रामनगर, शिक्षक कॉलनी, एकता नगर, केशवनगर, महावीर नगर, लक्ष्मी नगर, अष्टविनायक नगर परिसरात पिवळसर व अशुध्द पाणी पुरवठा होत असल्याची बाब दिनांक २४ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, बुलढाणा शहरात पूर्ण क्षमतेने नियमित शुध्द पाणी पुरवठा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) दि. २४.०५.२०१७ रोजी शहरातील शासकीय मुलींचे वसतीगृह, सर्क्युलर रोडवर २०० एम.एम. मुख्य जलवाहीनीमध्ये गळती झाल्याचे निदर्शनास आले व त्यामुळे पाण्यामध्ये माती मिश्रित होऊन पाणी पिवळसर व गढुळ पुरवठा झाल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे मुख्य जलवाहीनीवरील पाणी पुरवठा तात्काळ खंडीत करून त्याच दिवशी जलवाहीनीची दुरूस्ती करण्यात आली आणि नळधारकांना शुध्द पिण्याचे पाणी वितरित करण्यात आले आहे.

(३) • बुलढाणा शहरापासून ५ कि.मी. अंतरावरील येळगाव धरण येथील जलशुध्दीकरण केंद्रावरून शहरास पाणी पुरवठा वितरित करण्यात येतो.

• महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत खडकपूर्णा धरण, ता. देऊळगावराजा येथुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बुलढाणा यांच्याव्दारे पाणी पुरवठा प्रस्तावित असुन या योजनेची भौतिक प्रगती ७० टक्के झाली आहे.

• सदर योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात शहरातील सुमारे ९० कि.मी. लांब पाणी पुरवठा वितरण व्यवस्था, दोन उंच टाक्या पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे. त्यानंतर शहरास पूर्ण क्षमतेने पाणी पुरवठा होईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

उल्हासनगर-३ येथे औद्योगिक क्षेत्राचे आरक्षण असतांना रहिवाशी संकुल उभारण्यात आल्याबाबत

(२७) * ९०४६८ श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर-३ येथील भुखंड क्र.३५ व ३६ सिटी नं.७ सिटीएस क्र.१७६२६ आणि १७६२७ या ठिकाणी औद्योगिक क्षेत्राचे आरक्षण असताना " मोहन इर्टिगा" नामक रहिवाशी संकुल उभारले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाच्या सर्व विभागाकडून ना हरकत दाखल्यांची विकासकांने पुर्तता न करताच उल्हासनगर महानगरपालिकेने विकासकाला बांधकाम परवानगी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठिकाणी औद्योगिक क्षेत्रावर अवैधरित्या रहिवाशी क्षेत्र कोणत्या अटी व शर्तीनूसार उभारण्यात आले आहे,

(४) असल्यास, यामध्ये शासनाचा करोडो रूपयांचा महसुल बुडविणाऱ्या संबंधित दोषींवर शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) होय.

नगर विकास विभागाकडील शासन निर्णय दिनांक २९/११/२०१२ मधील तरतुदीनुसार महानगरपालिका क्षेत्रातील औदयोगिक वापराच्या क्षेत्रावर काही अटी/ शर्तीच्या अधिन राहून रहिवासी वापरास महानगरपालिकेने दिनांक १६/७/२०१५ रोजी सुधारीत मंजूरी दिलेली आहे. महानगरपालिकेकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना दिनांक २६/२/२०१६ रोजी महानगरपालिकेने सुनावणी देवून सुनावणीच्या आदेशामध्ये सदर प्रकरणी अग्निशमन विभागाचा दाखला/ कामगार आयुक्त यांचे ना-हरकत प्रमाणपत्र दाखल करण्यास दिनांक २६/२/२०१६ अन्वये आदेशित करुन दिनांक १७/११/२०१६ चे पत्रान्वये पुढील बांधकामास स्थगिती दिली होती. विकासकाने आवश्यक

कागदपत्रे जसे अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्र, मालकी हक्काची कागदपत्रे, सुविधा क्षेत्र हस्तांतरीत करण्याचा करारनामा इत्यादींची पुर्तता केली असल्याने, प्रकल्प पुर्णत्वाचा दाखला घेण्यापुर्वी कामगार आयुक्त यांचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करण्याचे अटींवर दिनांक १६/१/२०१७ चे पत्रान्वये स्थगिती उठविली आहे.

(४) शासनाचा महसूल बुडविल्याबाबतची बाब निदर्शनास आली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

वर्तक नगर (ठाणे) येथील हब टावून ग्रीनवूड या विकासकाने गृह प्रकल्पात नऊशे सदनिकाधारकांची फसवणूक केल्याबाबत

(२८) * ८८२४८ श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्तक नगर (ठाणे) येथील हब टावून ग्रीनवूड (मे. आकृती सिटी ली.) या विकासकाने गृह प्रकल्पात ९०० सदनिकाधारकांची फसवणूक केल्याची तक्रार महानगरपालिकेकडे दिनांक १६ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास सदनिकाधारकांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गृह प्रकल्पात सन २००९ मध्ये काम सुरु करून सन २०११ ला सदनिकांचे ताबा देण्याचे विकासकाने सांगितले होते मात्र संबधितांना अद्याप ताबा देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) अशा स्वरुपाची तक्रार महानगरपालिकेकडे जुन, २०१६ मध्ये प्राप्त झाली आहे.

(२) व (३) विकासकाने सन २०११ पासून टप्पा टप्प्याने सदनिकांचा ताबा देण्याचे मान्य केले होते. परंतु अद्यापही सदनिकांचा ताबा मिळत नसल्याची तक्रार उक्त पत्रात केली आहे.

विकासकास उक्त प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या रेंटल हौसिंग स्किममध्ये मंजुर आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना विनामुल्य बांधून देण्याच्या ५ इमारती व विक्रीकरीता ७ इमारती अशा एकूण १२ इमारतींपैकी ३ इमारतीकरीता वापर परवान्यासाठी ठाणे महानगरपालिकेकडे प्रस्ताव दाखल केला आहे.

उक्त प्रकल्प मंजुर करताना अट क्र. ८ नुसार रेंटल हौसिंग इमारतीचे काम विक्री इमारतीपूर्वी करणे आवश्यक आहे व तोपर्यंत विक्री इमारतीस वापर परवाना अदा करता येणार नाही अशा सूचना आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.

तसेच या प्रकरणी रेरा अंतर्गत उक्त प्रकल्प नोंदणीकृत असल्याची खात्री करण्याच्या सूचना आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई शहरातील महानगरपालिकेची मोकळी मैदाने व उद्याने संस्थांकडून ताब्यात घेण्याबाबत

(२९) * ८४९७२ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील महानगरपालिकेची मोकळी मैदाने, उद्याने आदींकरिता निश्चित धोरण लागू करण्याचे काम अंतिम टप्प्यात आले असतानाही अद्याप ६० संस्थांनी उद्याने, मैदाने हस्तांतरित केली नसल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापैकी सर्वाधिक ३४ मोकळ्या जागा पश्चिम उपनगरातील आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दहिसर ते कांदिवली या भागातील सर्वाधिक २० मोकळया जागा अद्याप माहनगरपालिकेच्या ताब्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात चौकशी केली आहे काय असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदरची सर्व मैदाने व उद्याने संस्थांकडून ताब्यात घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने दत्तक तत्वावर दिलेल्या २१६ भूखंडांपैकी १७४ भूखंड महानगरपालिकेने ताब्यात घेतले असून उर्वरित ४२ भूखंड ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) व (३) महानगरपालिकेने ताब्यात घ्यावयाच्या उर्वरित ४२ भूखंडांपैकी ३१ भूखंड पश्चिम उपनगरातील असून दहिसर ते कांदिवली या भागातील १२ भूखंड महानगरपालिकेने ताब्यात घेणे बाकी आहे.

(४) व (५) भूखंड टप्प्यटप्प्याने ताब्यात घेण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

निम्नपैन गंगा प्रकल्पासाठी खरेदी करण्यात आलेल्या शेतजमिनीचे क्षेत्रफळ जास्त दाखवून तलाठ्याने कोट्यावधीचा अपहार केल्याबाबत

(३०) * ९२३११ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्णी पोलीस ठाणे (ता.आर्णी, जि.यवतमाळ) येथे विनोद ठाकरे या निवृत्त तलाठ्या विरोधात निम्नपैन गंगा प्रकल्पासाठी खरेदी करण्यात आलेल्या शेतजमिनीचे क्षेत्रफळ जास्त दाखवुन ९ कोटी रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी दिनांक १८ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास गुन्हा दाखल केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्णी गावातील ४६ शेतकऱ्यांपैकी अनेक शेतकऱ्यांचे जमिनीचे बनावट ७/१२ तयार करुन ७/१२ चे क्षेत्रफळ व आकार या तलाठ्याने बदलले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्यानुसार शासनाने तलाठ्याविरूद्ध कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

तथापि सदर प्रकरणी पोलीस स्टेशन, आर्णी येथे गुन्हा नोंद नसून पोलीस स्टेशन, पारवा येथे गुन्हा दाखल आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी तपासात मौजा खडका ,ता. आर्णी येथील तत्कालीन तलाठी विनोद हरीभाऊ ठाकरे यांनी नियोजित निम्न पैनगंगा प्रकल्पाच्या भुसंपादन प्रकरणी ४६ शेतकऱ्यांपैकी काही शेतकऱ्यांच्या सातबारा मध्ये अधिक क्षेत्रफळ दाखवून व काही शेतकऱ्यांच्या सातबारामध्ये जलसिंचन साधने, झाडे, पपई , भुईमुग अशा प्रकारच्या अगाऊ नोंदी घेऊन बनावट सातबारा तयार करून दिला त्यामुळे शेतकऱ्यांना जादा मोबदला मिळाला. तसेच सातबारामध्ये खाडाखोड केल्याचे आढळून आले आहे.

सदर प्रकरणी तहसीलदार, आर्णी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन, पारवा येथे तत्कालीन तलाठी, मौजा खडका यांचेविरोधात गु.र. क्र. १४/१७ कलम ४२०, ४६५ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.आरोपी तलाठी गुन्हा दाखल केल्यापासून फरार असून त्याचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हा तपासावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

सांगली जिल्हयातील सांगली-मिरज या राज्यमार्गाच्या दुतर्फा असलेल्या झाडांना आग लावल्याने झाड कोसळून विद्यार्थ्यांचा मृत्यु झाल्याबाबत

(३१) * **९१८४२ श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील सांगली-मिरज या राज्यमार्गाच्या दुतर्फा असलेल्या झाडांना आग लावून ती जाळल्याची घटना माहे एप्रिल-मे २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकारामुळे वालचंद अभियांत्रीकी महाविद्यालयासमोरील झाड स्कुलबसवरती पडून ३ विद्यार्थ्यांचा मृत्यु झाला आहे, हे ही खरी आहे काय,

(३) असल्यास, झाडांना आग लावण्याच्या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व तद्नुसार दोषी आढळणाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील : (१) हे खरे नाही.

तथापी, अशा प्रकारची घटना दिनांक १५/०३/२०१२ रोजी सकाळी ८:१५ मि. च्या सुमारास घडली आहे.

(२) दिनांक १५/०३/२०१२ रोजी अशी दुर्घटना घडलेली आहे.

(३) पोलीस विभागामार्फत चौकशी करण्यात आली आहे.

(४) प्रस्तुत अपघात प्रकरणी सा.बां. उपविभाग, मिरज येथील संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचे विरुध्द न्यायालयात दोषारोप पत्रे पाठविणेस मंजूरी देण्यात येवू नये असा निर्णय शासनाने घेतलेला आहे. याबाबत, शासनपत्र दिनांक ११/०१/२०१७ अन्वये पोलीस अधिक्षक, सांगली यांना कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्हा परिषदेतील खनिज विकास निधीअंर्गत प्रस्ताव मंजूरीकरिता खनिकर्म अधिकाऱ्यांला लाच घेताना अटक केल्याबाबत

(३२) * ८७६१७ डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हा परिषदेतील खनिज विकास निधीअंतर्गत कामाच्या अंतिम देयकाचा प्रस्ताव मंजूरीकरिता रुपये २५ हजारांची लाच स्विकारतांना दिनांक २ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास खनिकर्म अधिकाऱ्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषींवर कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) आरोपी लोकसेवक श्री.भोगे व खाजगी इसम श्री.मोहिते यांच्याविरूद्ध शाहूपुरी पोलीस ठाणे,कोल्हापूर येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ च्या कलम ७,८,१३(१)(ड) सह १३(२) प्रमाणे दि.०२/०५/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.आलोसे श्री.भोगे यांना निलंबित करण्यात आले असून पुढील तपास सुरु आहे.

दहिसर (पश्चिम) येथील भिमनगर, डॉ.मायकलवाडी, कांदरपाडा, मिठागर रोड येथील बैठ्या चाळींच्या झोपडपट्टी पुनर्विकास योजनेअंतर्गत विकासकाने झोपडपट्टी धारकांची फसवणूक केल्याबाबत

(३३) * ९२३२७ श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.अजय चौधरी (शिवडी) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दहिसर (पश्चिम) येथील सिटी सर्व्हे नं.२०९, भिमनगर, डॉ.मायकलवाडी, कांदरपाडा, मिठागर रोड येथील बैठ्या चाळींचा झोपडपट्टी पुनर्विकास योजनेंतर्गत पुनर्विकासाचे काम श्री.नाथालाल जेलवाडीया या विकासकास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विकासकाने भिमनगर वेलफेअर सोसायटीतील झोपडपट्टीधारकांची सहमती न घेता बनावट नियोजित को.ऑप.हौ. सोसायटी स्थापन करुन सदर बैठ्या चाळींमधील झोपडपट्टीधारकांना त्यांचे संमतीपत्र नसतांना बैठ्या चाळीतील ३३० पात्र झोपडपट्टधारकांपैकी केवळ ३० ते ३५ पात्र झोपडपट्टीधारकांना जबरदस्तीने संक्रमण शिबीर म्हणून बांधलेल्या इमारतीत माहे जानेवारी, २००० मध्ये जागा दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, झोपडपट्टीच्या पुनर्विकासाचे काम पुर्ण न केल्याने झोपडपट्टीधारकांनी मा.मुख्यमंत्री, गृहनिर्माणमंत्री व सहनिबंधक, म्हाडा तसेच एसआरए प्राधिकरण यांच्याकडे दिनांक २७ जानेवारी, २०१४ व तद्नंतर वारंवार लेखी तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर विकासकाने संक्रमण शिबीरासाठी बांधलेल्या इमारतीतील अनेक जागा स्थानिक गुंडांना हाताशी धरुन इतरांना बेकायदा विकणे व काही जागा भाड्याने दिल्या आहेत अशी तक्रार सिटी सर्वे नं.२०९ भिमनगर, डॉ.मायकलवाडी, कांदरपाडा, मिठागर रोड, दहिसर (पश्चिम), मुंबई-६८ च्या अध्यक्षांनी दिलेल्या निवेदनातही करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सिटी सर्वे नं.२०९, भिमनगर वेलफेअर सोसायटीतील झोपडपट्टीधारकांची श्री.नाथालाल जेलवाडीया या विकासकाने गुंडांना हाताशी धरुन फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार पुढे काय कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता : (१) होय, हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) दहिसर (पश्चिम) येथील न.भू.क्र.२०९, मौजे दहिसर, भिमनगर, मायकलवाडी येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजना खाजगी मालकीच्या जमिनीवर आहे. सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस दि.०४.०८.१९९७ रोजी सक्षम प्राधिकारी, अपर जिल्हाधिकारी (अतिक्रमण), मुंबई व मुंबई उपनगर यांनी परिशिष्ट-२ प्रदान केले आहे. सक्षम प्राधिकारी यांनी पारित केलेल्या परिशिष्ट-२ प्रमाणे सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमधील एकूण ३६९ बांधकामांपैकी ३३८ बांधकामे पात्र केलेली असून १००% संमती झोपडीधारकांनी दिल्याचे सक्षम प्राधिकाऱ्यांनी त्यांच्या दि.०४.०८.१९९७ च्या प्रमाणपत्रामध्ये नमुद केले आहे. विकासकाने सादर केलेली योजना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून दि.१५.०६.१९९८ रोजी स्विकृत करण्यात आली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाद्वारे सदर योजनेच्या जागेवर संक्रमण शिबीर बांधण्यासाठी परवानगी देण्यात आली नसल्याचे कळविण्यात आले आहे. सदर योजनेच्या जागेवर संक्रमण शिबीराबाबत स्थळपाहणी करुन अहवाल सादर करण्याचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाला कळविण्यात आले आहे. सदर प्रकरणी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सहनिबंधक, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी सर्व संबंधितांची सुनावणी घेतली असून यथोचित आदेश निर्गमित करण्यात आले असल्याचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

कळंबोली येथील सिडको प्रशासनाने २० वर्षापूर्वी उभारलेल्या बैठ्या घरांची दुरावस्था झाल्याबाबत

(३४) * ८५६९१ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल महानगरपालिका हद्दीतील कळंबोली येथील सिडको प्रशासनाने २० वर्षापूर्वी उभारलेल्या केएल १ व केएल २ वसाहतीतील जवळ-जवळ ३००० बैठ्या घरांची अतिशय दुरवस्था झाली असून त्यातील ९२ घरे अगदी धोकादायक असल्याचे माहे जून, २०१७ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बैठया घरांच्या दुरवस्थेमुळे भिंतीला तडे जावून तसेच छत व प्लास्टर कोसळण्याच्या अनेक घटनांमध्ये रहिवासी जखमी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त वसाहतीतील मल:निसारण वाहिन्या व जलवाहिन्या गेल्या २० वर्षांपासून बदलल्या नसल्यामुळे घाणीचे साम्राज्य निर्माण होवून शॉट सर्किटमुळे आगी लागण्याच्या घटनाही झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कळंबोली येथील धोकादायक इमारतींच्या पुर्नबांधणीबाबत कोणती कार्यवाही वा उपायायोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) नवी मुंबई येथे अल्प उत्पन्न गटासाठी के.एल.२, के.एल.४, के.एल.५, के.एल.६ अशा विविध आकारमानाच्या सदनिका सिडकोने बांधल्या आहेत. सदर सदनिका देखभाल व दुरुस्तीसाठी संबंधित अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन/गृहनिर्माण संस्था यांना हस्तांतरीत करण्यात आल्या आहेत.

या सदनिकांचे जून, २०१३ मध्ये तज्ञांमार्फत स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात आलेले होते व त्या अहवालानुसार ९७ सदनिका धोकादायक असल्याने संबंधित रहिवाशांना सदनिका रिकाम्या करण्याबाबत सिडकोने सूचना दिलेल्या आहेत. तसेच सप्टेंबर, २०१६ मध्ये केएल-२, सेक्टर-५ येथील काही सदनिकांची तज्ञांमार्फत स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात आले असता इमारत क्र.२३ ते २८ या इमारतींची स्ट्रक्चरल दुरुस्ती करण्याचे सुचविण्यात आले. कॉंक्रीटचा अस्तर निखळलेल्या ठिकाणी सिडको महामंडळाकडून वेळोवेळी दुरुस्ती करण्यात आलेली आहे.

(३) सदर सदनिकांच्या देखभाल दुरुस्तीची जबाबदारी संबंधित गृहनिर्माण संस्थांची/रहिवाशांची आहे. तरीदेखील मानवतेच्या दृष्टीने सिडको महामंडळाने सदर ९७ घरमालकांना महामंडळाच्या उलवे नोडमधील गृहनिर्माण योजनेमध्ये तात्पुरते राहण्यासाठी सदनिका देऊ केल्या होत्या. तथापि, फक्त एका घरमालकाने तेथे स्थानांतरीत होण्याची इच्छा दर्शविली आहे.

सदर वसाहतीमध्ये तेथील रहिवाशांनी अनधिकृत बांधकामे केल्यामुळे तेथील मलनि:स्सारण व जलवाहिन्यांवर अतिरिक्त भार येऊन मुख्य वाहिन्या

तुंबण्याचे प्रकार निदर्शनास येतात. तसेच, सिडकोमार्फत मुख्य वाहिन्यांची देखभाल व साफसफाई वेळोवेळी केली जाते. परिणामी, तेथे मोठ्या प्रमाणात घाणीचे साम्राज्य पसरल्याचे आढळून येत नाही.

(४) शासनाने दि.०१.१०.२०१६ अधिसूचनेनुसार नवी मुंबईतील सिडको प्राधिकरणाने बांधलेल्या इमारतींच्या पुनर्विकासाबाबत धोरण निश्चित केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईत रस्त्यावरून काढण्यात आलेले पेव्हर ब्लॉक कंत्राटदारांनी महानगरपालिका अधिका-यांशी संगनमत करून परस्पर विक्री केल्याबाबत

(३५) * ८६३७५ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत रस्त्यावरून काढण्यात आलेले पेव्हर ब्लॉक कंत्राटदारांनी महानगरपालिका अधिकाऱ्यांशी संगनमत करून खासगी सोसायटया आणि औद्योगिक कंपन्यांना करोडो रुपयांना परस्पर विकून शासनाची फसवणूक केल्याची धक्कादायक माहिती दिनांक ११ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गंभीर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) रस्त्यांच्या प्रतिबंधात्मक देखभाल/दुरुस्तीसाठी हाती घेतलेल्या रस्त्यांपैकी जे रस्ते पेव्हर ब्लॉक वापरुन तयार केलेले होते व ज्यामध्ये उंच सखलपणा होता अशा रस्त्यांच्या दुरुस्ती दरम्यान जे पेव्हर ब्लॉक निष्कासित करण्यात आले ते उपयोगात न येणाऱ्या वस्तु (Unserviceable Material) म्हणून क्षेपणभूमीवर पाठविण्यात येतात व त्याचे योग्य ते रेकॉर्ड ठेवले जाते असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर शहरातील आठ पुल धोकादायक असल्याबाबत

(३६) * ८८३३२ श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील आठ पुल धोकादायक झाले असून या पुलांची निर्मिती होईपर्यंत ब्रिटीशकालीन पुलांची डागडुजी करणे आवश्यक असल्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पुलांच्या स्ट्रक्चरल ऑडिटसाठी नियुक्त करण्यात आलेल्या स्ट्रकवेल डिझाईनिंग अँड कन्सल्टंट प्रा.लि या कंपनीने पुलांच्या मजबुतीकरणासाठी सुमारे दोन कोटी रुपये खर्च असल्याचे अहवालात नमुद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुलांच्या बांधकामास प्रशासकीय मंजुरी घेऊन निधी मंजूर करण्यात आला आहे काय,

(४) असल्यास,सदर पुलाच्या बांधकामास प्रत्यक्षात केव्हा सुरुवात करण्यात येणार आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) कोल्हापूर महानगरपालिकेकडून महानगर पालिका हद्दीतील जून्या ब्रिटीशकालीन आठ पूलांचे स्ट्रक्चरल ऑडीट पॅनलवरील स्ट्रकवेल डिझाईनिंग अँड कन्सल्टंट प्रा.लि या कंपनीकडून करुन घेण्यात आले आहे.

या पुलांच्या मजबूतीकरणासाठी सदरहू कंपनीकडून सादर केलेला रुपये १.८४ कोटी इतक्या खर्चाचा अहवाल महानगरपालिकेकडून तपासण्यात येत असून तदनंतर सदर अहवाल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या मान्यतेकरीता सादर करण्यात येणार असून त्यानूसार पुढील कार्यवाही महानगर पालिकेकडून करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अलिबाग नगरपरिषदेतील (जि.रायगड) क्रीडा संकूल व तरण तलावाच्या कामासाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबत

(३७) * **८८१८२ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग नगरपरिषदेमार्फत (जि.रायगड) श्रीबाग नं.२ मध्ये तरण तलाव क्रीडा संकुलाच्या कामासाठी शासनाच्या वैशिष्टयपूर्ण योजनेंतर्गत दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ रोजी रूपये २ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तरण तलावाचे व क्रिडा संकुलाचे कामास अलिबाग नगरपरिषदेमार्फत निविदा काढून काम सुरू करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तरण तलाव व क्रिडा संकुलाचे कामासाठी जिल्हा प्रशासनाकडे वर्ग करण्यात आलेला निधी जिल्हा प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे व्यपगत झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अलिबाग नगरपरिषदेमार्फत सुरू असलेल्या क्रिडा संकुल व तरण तलावाच्या कामासाठी शासनाकडून निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) शासन निर्णय दिनांक १८/११/२०१५ अन्वये वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत अलिबाग नगरपरिषदेस रु.२ कोटी इतका निधी मंजुर करण्यात आला होता हे खरे आहे.

(२) अलिबाग नगरपरिषदेने त्यांच्या ठरावाद्वारे सदरच्या कामास मान्यता दिलेली आहे. तसेच, निविदा मंजूर केली आहे. मात्र, वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गतच्या शासनाच्या उपरोक्त मंजूर निधीमधून तरण तलाव क्रिडा संकुलाच्या कामासाठी जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता दिलेली नाही.

(३) व (४) दिनांक १८/११/२०१५ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे वैशिष्टयपूर्ण योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेला रू.२ कोटी इतका निधी अर्थसंकल्प वितरण प्रणाली (BEAMS) मध्ये उद्भवलेल्या तांत्रिक अडचणीमुळे दिनांक ३१ मार्च, २०१६ अखेर आहरीत झाला नाही व सदरचा निधी व्यपगत झाला. व्यपगत झालेल्या निधीच्या अनुषंगाने पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

कळमनुरी (जि.हिंगोली) येथील नगरपालिकेंतर्गत महाराष्ट्र सूजल व निर्मल अभियानांतर्गत गैरव्यवहार झाल्याबाबत

(३८) * **९२४६३ श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी (जि.हिंगोली) येथील नगरपालिकेंतर्गत अनुसूचित व नवबौद्ध जातीसाठी महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत शौचालय व खाजगी नळ योजनेंतर्गत सबंधित ठेकेदारांनी बनावट नावे दाखवून परस्पर रक्कम उचलून गैरव्यवहार केला असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या ठिकाणी इंदिरा नगर, भिमनगर व इतर भागात स्वखर्चातून शौचालय बांधूनही लाभार्थी दाखवले व त्या कामामध्ये आर्थिक गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सबंधितावर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) अशा आशयाची तक्रार जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्याकडे प्राप्त झाली आहे.

(३) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सहायक जिल्हाधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, कळमनुरी यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली.

महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत २२९ लाभार्थ्यांना शौचालय बांधकाम करुन दिले आहे व ठेकेदारास या २२९ शौचालय बांधकामापोटी देयक अदा केले आहे.

प्रस्तुत प्रकरणी लेखाविषयक त्रुटी आढळून आल्याने जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्या आदेशानुसार लेखापरीक्षण करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

यवतमाळ येथे अपसंपदा गोळा केल्याप्रकरणी कामगार कल्याण महिला अधिक्षक यांच्याविरोधात गुन्हा दाखल केल्याबाबत

(३९) * **८५९३९ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ येथील ३२ लाख रुपयांची अपसंपदा गोळा केल्याच्या आरोपावरुन कामगार कल्याण महिला अधिक्षक प्रज्ञा म्हात्रे यांच्याविरोधात लाचलूचपत प्रतिबंधक विभागाने गुन्हा दाखल केल्याचे दिनांक १३ जुन, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित अधिकारी यांची विभागीय चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर अधिकाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर : (१) यवतमाळ येथे गुन्हा दाखल झालेला नाही. तथापि, श्रीमती प्रज्ञा म्हात्रे यांचेकडे चौकशी अंती त्यांच्या सेवा कालावधीत ३२.१८ टक्के अपसंपदा संपादित केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे त्यांचे विरुद्ध लाप्रवि मुंबई विभाग येथे मूरक्र १४/ २०१७ १३(१) ९ (ई) सह १३(२) भ्रप्र अधिनियम, १९८८ अन्वये मुंबई येथे दिनांक ०४.०५.२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(२) लाचलुचपत प्रतिबंधक यांच्याकडे चौकशीची कार्यवाही सुरु असल्याने विभागीय चौकशी करण्यात आलेली नाही.

(३) लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांनी चौकशी पूर्ण करुन त्यांच्या दिनांक १८/४/२०१७ च्या अंतिम अहवालात श्रीमती म्हात्रे यांचेकडे सेवा कालावधीत ३२.१८ टक्के अपसंपदा संपादित केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचे विरुद्ध गुन्हा दाखल करुन लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून सादर झालेल्या दि.११.०५.२०१७ च्या पत्राच्या अनुषंगाने श्रीमती प्रज्ञा म्हात्रे, कामगार कल्याण निधी निरीक्षक (क) यांना अधीक्षक या समकक्ष वेतन श्रेणी असणाऱ्या पदावर बदली करुन त्यांना दि.१२.०५.२०१७ (म.नं.) पासून निलंबित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

टिळकनगर, चेंबूर (मुंबई उपनगर) येथील महालक्ष्मी हौसिंग को.ऑप. सोसायटीने म्हाडाची फसवणुक केल्याबाबत

(४०) * ८५११४ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चेंबूर (मुंबई उपनगर) येथील टिळकनगरात खोटे प्रतिज्ञापत्र व कागदपत्राद्वारे म्हाडा अधिनियामातंर्गत भूखंड घेत महालक्ष्मी हौसिंग को.ऑप. सोसायटी बांधून म्हाडाची सुमारे ४० कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी टिळकनगर पोलीस ठाण्यात सोसायटीच्या माजी पदाधिकाऱ्यांसह ६ जणांवर गुन्हा दाखल केला असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गुन्हा नोंदविण्यात आलेल्यांपैकी बहुतेकजण हे सरकारी कर्मचारी आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार अशा प्रकारे म्हाडाची फसवणूक करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.

सदर प्रकरणी महालक्ष्मी हौसिंग को.ऑप. सोसायटी, टिळकनगर, चेंबुर च्या ४ कमिटी सदस्य व २ विकासक यांच्याविरुध्द शासनाकडून भूखंड घेऊन त्यावर केलेल्या बांधकामापैकी २० टक्के सदनिका या शासन/म्हाडास देणे बंधनकारक असतांना त्यांची परस्पर विक्री करुन शासनाची/म्हाडाची सुमारे १५ ते २० कोटी रुपयांची फसवणूक करुन अपहार केल्याबाबत टिळकनगर पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. १५९/१७, भा.दं.वि. कलम ४०३, ४०६, ४२०, ४२३, ४६४, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ अन्वये ६ आरोपींविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(२) गुन्ह्यात आरोपी असलेल्या ६ व्यक्तींपैकी ३ व्यक्ती हे सेवानिवृत्त पोलीस अधिकारी आहेत तसेच, १ व्यक्ती सध्या पोलीस हवालदार पदावर कार्यरत आहे.

(३) व (४) सदर गुन्ह्यातील सर्व आरोपींना मा.सत्र न्यायालयाने अंतरिम अटकपूर्व जामीन मंजूर केला असून नमूद गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर परिसरात पोलीस विभागाच्या तब्बल २५० एकर जमिनीवर भुमाफियांनी प्लॉट पाडून विक्री केल्याबाबत

(४१) * ८५०१५ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर पोलीसांची दाभा येथे २५ एकर जमिनीशिवाय शहरात तब्बल २२५ एकर अधिक जमीन असून या जमीनीची किंमत पाच हजार कोटी रूपयांच्यावर आहे,या जमीनी महत्वाच्या ठिकाणी असून भुमाफीयांनी या जमीनीचा अनधिकृत ताबा घेऊन त्यावर प्लॉट पाडून काही अधिकाऱ्यांना आर्थिक फायदा देवून नकाशा मंजूर करून घेतला आणि सर्व प्लॉट बेकायदेशीररित्या करोडो रूपयांनी विकल्याची गंभीर माहिती दिनांक १५ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गंभीर प्रकरणाची माहिती पोलीस उपायुक्त (मुख्यालय) नागपूर यांना माहित होताच त्यांनी तात्काळ नागपूर सुधार प्रन्यास, जिल्हाधिकारी नागपूर यांना पत्र लिहून तातडीने मंजूर करण्यात आलेला नकाशा रद्द करावा, अशी मागणी करणारे पत्र पाठविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गंभीर प्रकरणाची राज्य शासनाने सखोल चौकशी केली आहे काय वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, या गंभीर प्रकरणात सामील असलेल्या संबधितावर राज्य शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) पोलीस विभागाची मौजा दाभा येथील जमिनीपैकी ०.६९ हेक्टर जागेवर आंतरभारती आश्रमाची (गोरक्षण) वहीवाट असून वहीवाट निरस्त करण्याबाबतची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे.

(२) होय. मौजा-दाभा येथील पोलीस विभागाच्या जमिनीवर नागपूर सुधार प्रन्यास कार्यालयामार्फत भुखंड अभिन्यास मंजूर करण्यात आल्याचे क्लस्टर नकाशावरून दिसून आल्याने सदर नकाशा तात्काळ प्रभावाने रद्द करण्याबाबत पोलीस उप-आयुक्त (मुख्यालय), नागपूर शहर यांनी सभापती, नागपूर सुधार प्रन्यास यांना दिनांक ०२.०५.२०१७ रोजी पत्र पाठविले होते.

(३) व (४) क्लस्टर प्लॅनवर खसरा क्रमांक १६८, मौजा-दाभा या जागेवर चिखली गृहनिर्माण सहकारी संस्थेचा अभिन्यास चुकीने दर्शविण्यात आलेला असून, नागपूर सुधार प्रन्यासतर्फे खसरा क्रमांक १६८, मौजा-दाभा या जमिनीवर कुठलाही अभिन्यास नियमित करण्यात आलेला नाही, असे कार्यकारी अभियंता (पश्चिम), नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांनी दिनांक २०.०५.२०१७ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

दिपनगर-निंभोरा (ता.भुसावळ, जि. जळगाव) येथील बेपत्ता सरपंचाचा संशयास्पद मृत्यू झाल्याबाबत

(४२) * ९०३९९ श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिपनगर-निंभोरा (ता.भुसावळ, जि.जळगाव) येथील सरपंच शालीक सोनवणे हे दिनांक १५ जून, २०१७ रोजीपासून बेपत्ता असल्याने तालुका पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १९ जून, २०१७ रोजी मुंबई - नागपूर रेल्वे लाईनच्या बाजुला त्यांचा मृतदेह सापडल्याने संतप्त नागरिकांनी रास्ता रोको केला, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळुन आले व त्यानुसार शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली आहे, वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय,

सदर प्रकरणी दि.१६/०६/२०१७ रोजी मिसिं र.नं. ०४/२०१७ प्रमाणे मिसिंगची नोंद करण्यात आली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) सदर मृत्यु बाबत भुसावळ पोलीस स्टेशन येथे अ.मृ.र.नं.२०/२०१७ क्रि.प्रो.को.क.१७४ नुसार नोंद घेण्यात आली आहे.

तपासात मयताचा मृत्यु हा अति दारु सेवनाने झाल्याचे केमिकल अनालायझर यांचे व्हिसेरा तपासणी अहवालावरुन निष्पन्न झाले आहे.

(५) विलंब झाला नाही.

बाणेर शहर (पुणे) येथील गावकमानीजवळ सुजाता जयप्रकाश श्रॉफ या महिलेने बेदरकारपणे कार चालवून ५ व्यक्तींना चिरडल्याबाबत

(४३) *८५२५१ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाणेर शहर (पुणे) येथील गावकमानीजवळ दिनांक १७ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास दु.२.३० वाजता सुजाता जयप्रकाश श्रॉफ यांनी एमएच १२ जीव्ही ८७३४ ही कार बेदरकारपणे चालवून ५ व्यक्तींना चिरडले, त्यापैकी २ व्यक्ती मृत्यूमुखी पडून ३ गंभीर जखमी झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महिला सुजाता श्रॉफ या गाडी चालवीत असताना मोबाईलवर बोलत असल्याचे प्रत्यक्षदर्शींनी पोलीसांना सांगूनही पोलीसांनी हेतूपुरस्सर पंचनाम्यात तशी नोंद न घेणे, प्रत्यक्षदर्शींचे जाबजबाब तसेच मोबाईलसह अनेक पुराव्यांची नोंद न घणे व सदर महिलेने अपघात केल्यानंतर तिचा तातडीने तपास न करणे यामुळे नोंदविण्यात आलेली कलमे व पंचनामा यामध्ये राजकीय दडपणामुळे हेतूत: त्रुटी ठेवण्यात आल्याचा संशय अनेक जाणकार नागरिकांनी व्यक्त केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार संशयास्पद काम करणाऱ्या चतुश्रृंगी पोलीस ठाण्याच्या संबंधीत पोलीस अधिकाऱ्यांविरुध्द तसेच बेदरकारपणे कार चालवून ५ व्यक्तींना चिरडणा-या सदर महिलेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.
(३) व (४) सदर प्रकरणी महिलेविरुद्ध चतुश्रृंगी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.२१५/२०१७ भादंवि कलम ३०४, २७९, ३३८, मो.वा. कायदा कलम १३२ (१) (क), १७९, १८४, ११९/१७७ प्रमाणे गुन्हा नोंद करुन महिलेला अटक करण्यात आली आहे. तसेच सदर गुन्ह्यात महिलेविरुद्ध मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, शिवाजीनगर न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे. गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये पोलीसांनी कोणताही हलगर्जीपणा, निष्काळजीपणा अथवा संशयास्पद काम / प्रकार केलेला दिसून येत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर शहरातील घनकच-यावर प्रक्रिया करण्यासाठी नेमलेल्या हंगर बायोटेक कंपनीला मुदतवाढ दिल्याबाबत

(४४) * ८६४०१ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील घनकच-यावर प्रक्रिया करण्यासाठी नेमलेल्या हंजर बायोटेक कंपनीने ६०० मेट्रिक टन कच-यावर प्रक्रिया न करता फक्त २०० मेट्रिक टन कच-यावर प्रक्रिया केली असून याबाबत तक्रार झाल्यानंतर राष्ट्रीय हरीत लवादने प्रत्यक्ष पाहणी करून हंजर बायोटेक कंपनीवर १.६४ कोटींचा दंड ठोठावला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक २९ ऑक्टोबर,२०१४ ते दिनांक २७ ऑक्टोबर, २०१५ या काळापर्यंत प्रतिदिवस २५ हजार असा दंड ठोठावण्यात आला असता त्यानंतरच्या काळात दंडाच्या रक्कमेत वाढ होऊन तो ५.४० कोटी झाला असतांना अद्यापही सदर दंडाची रक्कम वसूल करण्यात आली नसल्याची माहिती दिनांक ११ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हंजर बायोटेक कंपनीवर ५.४० कोटी दंडाची रक्कम वसूल करणे बाकी असंताना सुध्दा नागपूर महानगरपालिकेने ८३.६७ लाख रूपये हंजर बायोटेक कंपनीला दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राष्ट्रीय हरीत लवादाने महानगरपालिकेला हा करार रदद करण्याबाबत निर्देश दिले असतांनासुध्दा महानगरपालिकेने सदर कंपनीला पुन्हा मुदतवाढ दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) राष्ट्रीय हरीत लवादाच्या निर्देशानुसार, हंजर बायोटेक कंपनीला प्रकल्पाची क्षमता तातडीने वाढविण्याबाबत महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले होते. तथापि, कंपनीकडून या प्रकल्पाची क्षमता वाढविली गेली नाही.

तथापि, महापालिकेने करारातील अटी व शर्तीनुसार रु.१,६४,२५,०००/- इतक्या दंडाची आकारणी केलेली आहे.

(२) हे खरे नाही.

या कंपनीस दिनांक २९/१०/२०१३ ते दिनांक ०६/०६/२०१४ या कालावधीसाठी रु.२५ हजार प्रति दिन व दिनांक ०७/०६/२०१४ पासून दिनांक २०/०१/२०१५ या कालावधीसाठी रु.५० हजार प्रति दिन या दराने एकूण रु.१.६४ कोटी इतक्या दंडाची आकारणी करण्यात आलेली आहे.

तद्नंतर राष्ट्रीय हरित लवादाने दिलेल्या आदेशाच्या आधारावर या प्रकल्पाची घनकचरा प्रक्रिया २०० मेट्रीक टनापर्यंत सिमीत करण्यात आल्यानंतर, कंपनीकडून या मर्यादेत घनकच-यावर प्रक्रिया सुरु असल्याने, त्यानंतरच्या कालावधीसाठी कंपनीस दंडाची आकारणी केलेली नाही.

(३) कंपनीस केलेल्या दंडाची रक्कम रु.५.४० कोटी इतकी नसून, रु.१.६४ कोटी इतकी आहे. सदर रक्कम वसूल करणे बाकी आहे. सदर रकमेच्या वसुलीची आवश्यक कार्यवाही महापालिकेकडून सुरु आहे.

महापालिकेकडून कंपनीस देय असलेल्या टिपींग फी मधून रु.८३.६७ लक्ष इतकी रक्कम कंपनीला अदा करुन, हरीत लवादाच्या आदेशात नमूद केल्यानुसार, प्रकल्प सुरळीत सुरु ठेवण्याची काळजी घेतलेली आहे.

(४) हे खरे नाही.

या प्रकल्पाच्या मूळ करारानुसार, सदरचा कालावधी १२ वर्षाचा असून, तो सन २०२१ मध्ये संपुष्टात येणार आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

अलिबाग तालुक्यातील (जि.रायगड) अलिबाग कोळीवाडा येथे मच्छिमार जेट्टी बांधण्याबाबत

(४५) * **८८१९३ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग तालुक्यातील (जि.रायगड) अलिबाग कोळीवाडा येथे मच्छिमार जेट्टी बांधण्यासाठी निधी उपलब्ध असतानाही संबंधीत मे.एस.के. कंनस्ट्रक्शन या कंपनीला कार्यादेश देण्यात येऊनही माहे जून, २०१७ पर्यंत जेट्टीच्या कामास सुरूवात केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाने संबंधीत ठेकेदारावर विहित मुदतीत काम न केल्याने निविदा शर्तीनुसार कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जेट्टीचे बांधकाम करण्याबाबत ४ वर्षापूर्वी कार्यादेश होवूनही अद्यापही सदर बांधकाम पूर्ण न झाल्याने मच्छिमारांना अनेक संकटांना तोंड द्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संबंधितांवर तातडीने काम करण्याच्या दृष्टीने कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय.

(४) महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डामार्फत राबविल्या जाणा-या निविदा प्रक्रियेत सहभाग घेण्यास सदर कंपनीस पाच वर्षाकरीता बंदी घालण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे सदर कामाचे कार्यादेश रद्द करुन या कामाची फेर निविदा दिनांक १९.०६.२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. निविदा प्रक्रिया कार्यवाही बाकी आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

खडकी (ता.जि.अहमदनगर) येथे सहा वर्षाच्या मुलीस खाऊचे अमिष दाखवून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याबाबत

(४६) * **८६२७१ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडकी (ता.जि.अहमदनगर) येथे सहा वर्षाच्या मुलीस खाऊचे अमिष दाखवून तिच्यावर विनोद आल्हाट या नराधमाने लैंगिक अत्याचार केल्याचे दिनांक १५ जुन, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व तद्नुसार पोलिसांनी सदर आरोपीस अटक करून गुन्हा नोंदवुन अद्यापपर्यंत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, खरे आहे.

(२) होय.

(३) चौकशीत आरोपीने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले आहे व आरोपीस अटक केले आहे.

नगर तालुका पोलीस ठाणे येथे गु र नं. १६९/२०१७ भादंविक ३७६, ५०६, बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायदा सन २०१२ चे कलम ४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा पोलीस तपासावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

आलापल्ली (जि.गडचिरोली) येथे नक्षलवाद्यांना आर्थिक मदत करणाऱ्या तेंदूपत्ता ठेकेदारांना झालेली अटक

(४७) * **८५०७६ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयातील अहेरी येथील प्राणहिता पोलीस उपमुख्यालयाच्या विशेष पथकाला दिनांक २३ मे, २०१७ रोजी आलापल्ली येथे भामरागडच्या दिशेने जाणाऱ्या क्रमांक नसलेल्या बोलेरो गाडीत ७५ लाख रूपये आणि नक्षल पत्रके सापडल्याचे दिनांक १५ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गाडीमध्ये असलेल्या व्यक्तींची पोलीसांनी कसून चौकशी केली असता सदर गाडीत असलेले तिनही व्यक्ती हे तेंदूपत्ता ठेकेदार असून ही रक्कम नक्षल्यांना देणार असल्याची कबूली दिल्यामूळे त्यांना विविध कलमाखाली पोलीसांनी अटक केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही दिवसानंतर सदर रक्कम ही तेंदूपत्ता मजूरांची असल्याचे दाखवून पोलीसांनी सर्व आरोपींना सोडून दिले, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, या गंभीर प्रकरणाची उच्च स्तरीय अधिका-यांमार्फत सखोल चौकशी करण्यात आली आहे काय वा करण्यात येत आहे.

(५) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, तद्नुसार या गंभीर प्रकरणी दोषी आढळणाऱ्यांवर राज्य शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) दिनांक २३.०५.२०१७ रोजी बोलेरो वाहनातून रुपये ७५ लक्ष रोख रक्कम मावोवाद्यांना आर्थिक मदत पोहचवण्याचा गुन्हेगारी स्वरुपाचा कट केल्याचे निदर्शनास आले आहे. गाडीची तपासणी केली असता त्यात नक्षल पत्रके सापडली आहेत. सदर गुन्हयांत दोन इसम तेंदूपत्ता मॅनेजर व एक इमस गाडीचा चालक असून एकूण पाच आरोपींना अटक करण्यात आली आहे. सर्व आरोपी तेलंगणा राज्यातील आहेत. आरोपीने सदर रक्कम नक्षलवाद्यांना देणार असल्याचे कबूल केल्याने याबाबत पोलीस स्टेशन अहेरी अप क्र. ५८/२०१७ कलम १७, १८, २१ यु. ए. पी. ए. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयांतील जप्त रक्कम शासनाने दिलेल्या परवानगीनुसार स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा अहेरी, जिल्हा गडचिरोली येथे जमा करण्यात आली आहे.

सदर गुन्हयांतील सर्व अटक आरोपींना दिनांक ३१.०७.२०१७ पासून एम.सी.आर. वर जिल्हा कारागृह, चंद्रपूर येथे रवाना करण्यात आले आहे. आरोपीचा जामीन अर्ज मा.सत्र न्यायालय, गडचिरोली यांनी नाकारलेला आहे.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव
महाराष्ट्र विधानसभा

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.